RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

विदर्भाचा मानबिंदू

# विदर्भ केसरी

मुख्य संपादक : अमोल कटाळे

www.vidarbhkesari.com


अमरावती

२१ बुधवार जानेवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २३६

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

## अजित पवार यांचे विश्वासू भाजपात



■ राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका देखील जाहीर झाल्या आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर होताच राष्ट्रवादी अजित पवार गटाला पहिला धक्का बसला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते राजेंद्र गावडे यांनी भाजपात प्रवेश केला आहे. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीमध्ये त्यांनी भाजपात प्रवेश केला. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा राष्ट्रवादी अजित पवार गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. गावडे हे अजित पवार यांचे विश्वासू सहकारी मानले जातात, ते माजी आमदार पोपराव गावडे यांचे चिरंजीव आहेत.

## विद्यार्थ्याने संपवले जीवन

▸विदर्भ केसरी। केज (बीड) :

केज शहरातील समर्थ नगर भागातील एका १५ वर्षीय विद्यार्थ्याने केवळ आईने खेळायला जाऊ न दिल्याच्या रागातून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली. प्रतीक रामेश्वर डोईफोडे असे या मृत विद्यार्थ्याचे नाव असून तो विवेकानंद विद्या मंदिरात ९ वीच्या वर्गात शिकत होता. रविवारची सुटी असल्याने सकाळी १० वाजेच्या सुमारास प्रतीकचा एक मित्र त्याला खेळण्यासाठी घरी बोलवायला आला होता. मात्र, बाहेर ऊन असल्याने आईने प्रतीकला आता ऊन आहे, ४ वाजल्यानंतर खेळायला जा असे म्हणत मित्रासमोर हटकले. या गोष्टीचा राग प्रतीकच्या मनाला इतका लागला की, त्याने आई-वडिलांच्या बेडरूममध्ये जाऊन आतून कडी लावून घेतली आणि पंख्याला गळफास लावला.

## डीजीपी रामचंद्र राव अखेर निलंबित

▸विदर्भ केसरी। बंगळूरू :

कर्नाटकचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि डीजीपी पदावर कार्यरत असलेले रामचंद्र राव यांना निलंबित करण्यात आले आहे. सोशल मीडियावर त्यांचे आक्षेपार्ह व्हीडीओ व्हायरल झाल्यानंतर राज्य सरकारने ही कारवाई केली. रामचंद्र राव हे कर्नाटकमध्ये डीजीपी (सिव्हिल राइट्स एन्फोर्समेंट) या पदावर कार्यरत होते. सोमवारी सोशल मीडियावर काही व्हीडीओ क्लिप मोठया प्रमाणात व्हायरल झाल्या. या क्लिपमध्ये रामचंद्र राव हे वेगवेगळ्या महिलांसोबत अश्लील वर्तन करत असल्याचे दिसत असल्याचा दावा केला जात आहे.

# आता प्रत्यक्ष पडताळणी

## e-KYC चुकली तरी घाबरू नका ! : अदिती तटकरे

▸विदर्भ केसरी।

राज्य सरकारने राज्यातील गरीब महिलांसाठी लाडकी बहीण योजनेची सुरुवात केलेली आहे. राज्यातील लाखो महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. या योजनेअंतर्गत लाडक्या बहिणींना दरमहा 1500 रुपयांची आर्थिक मदत केली जाते. गावाखेड्यातील महिलांना या योजनेमुळे मोठा फायदा झालेला आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाडक्या बहिणींना वेळोवेळी eKYC करावी लागते. राज्य सरकारने ईकेवायसी करण्यासाठी 31 डिसेंबर ही शेवटची तारीख दिली होती. मात्र अनेक महिलांची ईकेवायसी करताना चूकीचा पर्याय निवडला होता. त्यामुळे या महिलांची केवायसी प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. आता अशा महिलांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

राज्य सरकारने लाडक्या बहिणींना मोठा दिलासा दिला आहे. महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी याबाबत ट्विट करताना अधिकाऱ्यांना महत्त्वाचा आदेश दिला आहे. आदिती तटकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना



राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजी पर्यंत e-KYC करण्याची मुदत देण्यात आली होती. तथापि, काही कारणास्तव e-KYC

■ महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेसंदर्भात सोशल मीडियावरून माहिती दिली असून, त्यांच्या या पोस्टवर लाभार्थी महिलांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिक्रिया येत आहेत. अनेक महिलांनी तांत्रिक अडचणींमुळे, विशेषतः ई-केवायसी करताना मोबाइलवर 'ओटीपी' न मिळाल्याने ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊ शकली नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे तांत्रिक बिघाडामुळे प्रक्रियेपासून वंचित राहिलेल्या महिलांना दिलासा देण्यासाठी ई-केवायसीची मुदत आणखी काही दिवस वाढवून मिळावी, अशी आग्रही मागणी सोशल मीडियाच्या माध्यमातून केली जात आहे.

करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. आदिती तटकरे यांच्या आदेशानंतर आता ज्या लाडक्या बहिणींनी चुकीचा पर्याय निवडला होता त्यांची आता पडताळणी होणार आहे. म्हणजे जी चुकीची माहिती होती त्यात आता दुरुस्ती करता येणार आहे. त्यामुळे चुकीच्या माहितीमुळे या योजनेतून नाव कमी होण्याची शक्यता कमी होणार आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या वाहनाला घेराव

▸विदर्भ केसरी।

महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी लाडकी बहिण योजना सुरु केली. ही योजना ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे अशा महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता आला. या योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला जवळपास दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. पण नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका, त्यापोठापाठ हापालिका निवडणुका या सगळ्यामुळे लाडकी बहीण योजनेता हाप्ता महिलांना मिळायला विलंब होत आहे. त्यामुळे महिलांनी संताप व्यक्त केला आहे.

वाशिम जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेचा हप्ता बंद झाल्याने आज महिलांचा संताप उफाळून आला. इ केवायसी होऊन ही त्यांना मागील दोन महिन्यांचा हप्ता मिळत नसल्याबाबत तक्रार मांडण्यासाठी अनेक महिला जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर पोहोचल्या होत्या. मात्र जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट नाकारण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला आहे. वारंवार विनंती करूनही आत प्रवेश न मिळाल्याने संतप्त महिलांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांच्या वाहनाला घेराव घालत जोरदार निषेध व्यक्त केला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील महिलांचा लाभ कायमस्वरूपी बंद होणार, या अफवेमुळे महिलांनी बुलढाण्याच्या जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयात धडक दिली आहे. गेल्या दोन महिन्यापासून लाभ कशामुळे बंद झाला, याच्या चौकशीसाठी महिलांनी मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे. बुलढाणा जिल्ह्यात साडेसहा लाखाच्यावर जवळपास महिला योजनेचा लाभ घेत होत्या. मात्र ई केवायसी मध्ये त्रुटी आल्याने जवळपास 30 हजार महिलांचा लाभ थांबलेला आहे. ई केवायसीमध्ये त्रुटी आढळल्याच्या प्रमुख कारणामुळेच हा लाभ थांबण्याची माहिती आहे.

## गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाची तब्बल २२ कोटी रुपयांची फसवणूक

▸विदर्भ केसरी। पुणे :

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने एका ज्येष्ठ नागरिकाची २२ कोटी रुपयांची, तर काळ्या पैशांच्या व्यवहारात कारवाईची भीती दाखवून महिलेची ४ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक सायबर चोरट्यांनी केल्याचा प्रकार समोर आला आहे.

एका ८८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने दिलेल्या तक्रारीनुसार सायबर चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्येष्ठ नागरिक हे मगरपट्टा सिटी परिसरात राहायला असून, त्यांचा हडपसरमधील औद्योगिक वसाहतीत छोटा कारखाना होता. कोरोना



काळात कारखान्याच्या विक्रीतून त्यांना मोठी रक्कम मिळाली. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात त्यांच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी संपर्क साधला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी दाखविले. चोरट्याच्या खात्यात त्यांनी सुरुवातीला काही रक्कम गुंतविली. चोरट्यांनी सुरुवातीला त्यांच्या खात्यात काही रक्कम जमा केली. रक्कम जमा केल्यानंतर चोरट्यांनी परतावा दिल्याचे भासविले. प्रत्यक्षात त्यांना परतावा दिला नाही. ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांच्या वेगवेगळ्या बँक खात्यात वेळोवेळी २२ कोटी ३ लाख २२ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करत आहेत.

केंद्रीय तपास यंत्रणांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची बतावणी करून नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. असाच एक प्रकार कोंढवा भागात राहणाऱ्या महिलेच्या बाबतीत घडला. काळ्या पैशांच्या व्यवहारात कारवाईची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी महिलेची चार लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक केली. सायबर चोरट्यांनी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर डिसेंबर महिन्यात संपर्क साधला होता. काळ्या पैशांच्या व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून चोरट्यांनी महिलेला अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे जमा करावे लागतील, असे सांगितल्याने महिला घाबरली आणि तिने चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिस निरीक्षक संगीता देवकाते तपास करत आहेत.

## कार नदीत कोसळून दोघांचा मृत्यू

▸विदर्भ केसरी। अहेरी,

एका बाजूला हत्येच्या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरलेला असतानाच, त्याच मृतकाच्या अंत्यसंस्कारावरून परतणाऱ्या नातलगांच्या कारला भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

ही घटना मंगळवार, 20 जानेवारी रोजी दुपारी घडली. बोरीनजिक दीना नदीच्या पुलावरून कार खाली कोसळल्याने एकाच कुटुंबातील दोघांचा मृत्यू झाला असून, तिघे जण मृत्यूशी झुंज देत आहेत. सुनील मुरलीधर कोलपाकवार (65) रा. बोरी व यादव कोलपाकवार (67) अशी मृतकांची नावे असून, गंभीर जखमींमध्ये पद्मा सत्यनारायण कोलपाकवार (55),



अर्चना यादव कोलपाकवार (60) आणि अभिजित यादव कोलपाकवार (35) यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आलापल्ली-सिरोंचा राष्ट्रीय महामार्गावर आरडी गोळा करणारे रवींद्र तंगडपल्लीवार यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ माजली होती. आज (ता. 20) त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यविधीसाठी आष्टी आणि बोरी येथील त्यांचे नातलग आले होते. अंत्यसंस्कार आटोपून आष्टीकडे परत जात असताना बोरी जवळील दीना नदीच्या पुलावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार थेट पुलावरून नदीत कोसळली. या भीषण अपघातात कारमधील पाचही जण गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने अहेरी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान दोघांची प्राणज्योत मालवली. तर पद्मा, अर्चना व अभिजित कोलपाकवार या जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना प्राथमिक उपचारानंतर तातडीने चंद्रपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

## अनुष्काच्या न्यायासाठी समाजबांधवांचा आक्रोश

▸विदर्भ केसरी। यवतमाळ :

लातूरच्या नवोदय विद्यालयात सहावीत शिकणाऱ्या अनुष्का पाटोळे या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाला. मात्र प्रशासन ही आत्महत्या असल्याचे भासवून बनवाबनवी करीत आहे. त्यामुळे या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी करत मातंग समाजबांधवांनी मंगळवारी यवतमाळात आक्रोश मोर्चा काढला. मातंग समाजाच्या वतीने तसेच विविध संघटनेच्या माध्यमातून हा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा विविध मार्गाने मार्गक्रमण करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

लातूर जिल्ह्यातील टाक या गावातील रहिवासी असणारी अनुष्का पाटोळे हिचा




तीन तारखेला मृत्यू झाला. हा मृत्यू फाशी घेऊन झाल्याचे दाखविण्यात आले. तसा उल्लेख पंचनाम्यात करण्यात आला. मात्र फाशी घेतल्याची कुठलीही लक्षणे तिच्या शरीरावर दिसून आलेली नाहीत.

त्यामुळे तिचा मृत्यू फाशीने नव्हे तर कदाचित घातपात घडवून करण्यात आला असावा, अशी शंका मातंग समाजाच्या वतीने आणि तिच्या पालकांनी व्यक्त केली. या प्रकरणात पोलिसांनी अद्यापही पाहिजे तशी चौकशी केलेली नाही, अनुष्काचा मृत्यू हा संशयास्पद परिस्थितीत असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी आणि खऱ्या आरोपींना समोर आणून हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे, आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मोर्चाद्वारे करण्यात आली.

निवेदनाची एक प्रत पोलीस अधीक्षकांनाही देण्यात आली. मोर्चात विविध सामाजिक संघटनांनी सहभाग घेऊन या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

## नराधमाला 20 वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा

▸विदर्भ केसरी। रत्नागिरी :

लांजा तालुक्यात शेजारी राहणाऱ्या नात्यातीलच अल्पवयीन मुलीला घरी जेवण बनवण्यासाठी बोलावून तिच्यावर जबरदस्तीने वारंवार अत्याचार केला. यात पीडिता 6 महिन्यांची गरोदर राहिली. या प्रकरणातील आरोपीला न्यायालयाने मंगळवार 20 जानेवारी रोजी 20 वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. ही घटना सन 2022 मध्ये घडली आहे.

साहिल दत्ताराम मसणे (वय 21, रा. पन्हळे मसणेवाडी लांजा, रत्नागिरी) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सन 2022 मध्ये त्याने घराशेजारीच नात्यातील अल्पवयीन मुलीला आपल्या घरी जेवण बनवण्याच्या बहाण्याने 4 ते 5 वेळा बोलावून तिच्यावर आपल्या घरी व काही वेळा पिडीतेच्या घरी



जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केले. तसेच याबाबत कोणाला सांगितले तर ठार मारण्याची धमकी दिली होती. दरम्यान, पीडिता 6 महिन्यांची गरोदर राहिल्याची बाब तिच्या नातेवाईकांच्या लक्षात येताच त्यांनी साहिल विरोधात लांजा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक पोलिस निरीक्षक तेजस्विनी पाटील यांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल दाखल केला होता. याप्रकरणी तपास करुन त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकिल ॲड.मेघना नलावडे यांनी 11 साक्षिदार तपासत युक्तिवाद केला. त्यांचा युक्तिवाद जिल्हा सत्र न्यायाधीश अनिलकुमार अंबाळकर यांनी ग्राह्य मानला. त्यांनी आरोपी साहिलला 20 वर्ष सक्तमजूरी 2 हजार दंड,(8) मध्ये 3 वर्ष शिक्षा व 500 दंड कलम (12) नुसार 1 वर्ष शिक्षा व 500 दंड अशी एकूण 20 वर्ष सक्तमजुरी आणि 11 हजार 500 रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या दंडातील 7 हजार रुपये पीडितेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. आरोपी हा गुन्हा घडला त्यावेळी 21 वर्षांचा असल्याने त्याच्या वकिलांतर्फे न्यायालयात त्याला अपराधी परिविक्षा अधिनियम 1958 (6) ची सवलत मिळावी, अशी मागणी केली होती. परंतू आरोपीने केलेला गुन्हा हा गंभीर व घृणास्पद असल्यामुळे त्याची विनंती न्यायालयाने नामंजूर केली.

## व्यायामशाळेसाठी देवळ्यात 'भिक मांगो' आंदोलन

### जमा झालेला निधी आमदारांच्या कार्यालयात सुपूर्द

▸विदर्भ केसरी। देवळा :

"शरीर सौष्ठव राखण्यासाठी हक्काची व्यायामशाळा द्या," ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी पडून आहे. वारंवार निवेदने देऊनही पदरी निराशाच आल्याने, अखेर देवळा तालुक्यातील दहिवड येथील सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामविकास समितीचे अध्यक्ष संजय दहिवडकर यांनी मंगळवारी (दि. २०) अभिनव असे 'भिक मांगो' आंदोलन केले. रस्त्यावर उभा राहुन झोळी पसरून जमा झालेली रक्कम त्यांनी थेट आमदारांच्या संपर्क कार्यालयात जमा करून प्रशासनाचे डोळे उघडण्याचा प्रयत्न केला.

दहिवड हे नाशिक जिल्ह्यातील



एक मोठे महसुली गाव म्हणून ओळखले जाते. गावातील शालेय विद्यार्थी आणि तरुणांच्या आरोग्यासाठी अद्ययावत जिम तथा व्यायामशाळा उभारण्याची मागणी संजय दहिवडकर यांनी आमदार डॉ. राहुल आहेर यांच्याकडे केली होती. यापूर्वी ग्रामसभेत आणि मासिक बैठकीतही याचे ठराव झाले होते. "जर मागणी पूर्ण झाली नाही, तर भिक मांगो आंदोलन करू," असा इशाराही त्यांनी दिला होता. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही हालचाल न झाल्याने अखेर दहिवडकर यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले.

### गावागावातून गोळा केली 'भिक्षा'

■ मंगळवारी सकाळी दहिवड गावापासून या आंदोलनाला सुरुवात झाली. संजय दहिवडकर यांनी हातात झोळी घेऊन धोबीघाट, मेशी फाटा, पिंपळगाव वाखारी, खुंटेवाडी फाटा आणि देवळा तालुक्यातील विविध शासकीय-निमशासकीय कार्यालयांच्या बाहेर उभे राहून भिक्षा मागितली. "सरकार एका व्यायामशाळेची मागणी पूर्ण करू शकत नाही, हा आमचा निषेध आहे," अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

### निधी आमदारांच्या कार्यालयात जमा

■ दिवसभर रस्त्यावर आणि कार्यालयांतून भिक्षा मागून जो निधी जमा झाला, तो दहिवडकर यांनी आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या देवळा येथील संपर्क कार्यालयात नेऊन दिला. "अठरापगड जाती-धर्माच्या लोकांचे हे गाव असूनही एका साध्या जिमसाठी आम्हाला रस्त्यावर उतरावे लागत आहे, हे दुर्दैवी आहे," असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

■ शासकीय यंत्रणेच्या दिरंगाई विरोधात पुकारलेल्या या अनोख्या आंदोलनाची सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चा रंगली आहे. आता तरी तरुणांच्या या मागणीची दखल घेऊन दहिवड येथे व्यायामशाळा उभी राहणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एक जण खड्ड्यात पडून ठार

▸विदर्भ केसरी। नागाव :

मुलांना शाळेत सोडून घरी येत असताना दुचाकी खड्ड्यात गेल्याने दुर्दैवाने एकजण जागीच ठार झाला. दिलीप दत्ता पोवार (वय ४७, रा. नागाव फाटा, ता. हातकणंगले) असे मृताचे नाव आहे. तर एक जण किरकोळ जखमी झाला. ही घटना नागाव फाटा येथील बँक ऑफ बडोदा समोर सकाळी दहा वाजता घडली.



या बाबतची अधिक माहिती अशी की, दिलीप पोवार आज सकाळी दहाच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील शाळेत मुलांना दुचाकीवरून सोडून घरी येत असताना सेवा रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांत त्याची गाडी गेल्याने तो रस्त्यावर पडला. त्याच्या डोक्यास गंभीर मार लागल्याने जागीच मृत्यू झाला. दरम्यान, नऊ वर्षापूर्वी नागाव फाटा येथील चौकात रस्ता ओलांडताना भरधाव टेम्पोने दिलीप यांच्या दुचाकीस जोराची धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला होता. रूग्णालयातील योग्य उपचारामुळे ८ दिवसांनी बरा होऊन घरी परतला होता. टेम्पोच्या धडकेतून तो सुखरूप बचावला. पण आज मात्र रस्त्यावर पडलेल्या खडीने त्याचा जीव घेतला.

पुणे - बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे . योग्य खबरदारी न घेता अनेक ठिकाणी पर्यायी रस्ता वळविण्यात आला आहे. रस्त्यात अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. दिलीपला येथील खड्ड्यांमुळे आपला जीव गमवावा लागला.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

बुधवार, २१ जानेवारी २०२६ | २

## अग्रलेख

# ग्रीनलँडचा गुंता

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे 'अमेरिका फर्स्ट'च्या नावाखाली सध्या मनमानी करत सुटले आहेत. संयुक्त राष्ट्रे, जी-8, क्वाड अशा वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या व्यासपीठावरून लोकशाही शांतता, परस्पर सामंजस्य अशा तत्त्वांचा उद्घोष करणारे ट्रम्प 'अमेरिका फर्स्ट' या नावाखाली उघड उघड दमदाटीचे राजकारण करत आहेत. इराणमधील निदर्शकांना उचकावतानाच त्या देशावर हल्ला करण्याची त्यांनी धमकी दिली आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो यांच्या मुसक्या बांधून, त्यांना अटक करून अमेरिकेत आणण्यात आले. ग्रीनलँड बेट ताब्यात घेण्याचा मानस व्हाईट हाऊसने यापूर्वीच व्यक्त केला होता आणि त्यासाठी लष्करी बळाच्या वापराचा पर्याय खुला असल्याचेही स्पष्ट केले होते. ट्रम्प यांचा ग्रीनलँडच्या नकाशाकडे पाहतानाचा एक फोटो व्हाईट हाऊसने शेअर केला. 'परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे', अशी कॅप्शन या फोटोला दिली होती. हा फोटो पोस्ट केल्यानंतर डेन्मार्कने अमेरिकेशी वाटाघाटी करणार असल्याचे जाहीर केले आहे. डेन्मार्कचे ग्रीनलँडवरील काही भागांवर प्रभुत्व आहे. कोणत्याही परिस्थितीत ट्रम्प यांना ग्रीनलँड ताब्यात हवे आहे. अन्यथा चीन किंवा रशिया ग्रीनलँड ताब्यात घेतील, असे त्यांचे मत आहे. युरोपियन युनियनने याबाबत तीव्र मतभेद व्यक्त केले आहेत. डेन्मार्क हा 'नाटो'चा (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) सदस्य असलेला देश आहे. ग्रीनलँडवर नियंत्रण मिळवण्यासाठी लष्कराचा वापर करण्यापेक्षा शक्यतो 'डील' करण्यास अग्रक्रम दिला जाईल, असे ट्रम्प यांचे धोरण आहे. शेवटी ट्रम्प हे एक शुद्ध व्यापारी आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे! ग्रीनलँडवर लष्करी कारवाई केल्यास 'नाटो'मधील देशांशी असलेले संबंध बिघडतील, असे डेन्मार्कला वाटते. उलट 'नाटो'चे काय व्हायचे ते होऊद्या, पण ग्रीनलँड कब्जात घेणार म्हणजे घेणार. आम्हाला 'नाटो'ची जितकी गरज आहे, त्यापेक्षा अधिक गरज 'नाटो'ला आमची आहे, अशी गर्जना ट्रम्प यांनी केली आहे.

जगातील सर्वात मोठे बेट असलेल्या ग्रीनलँडच्या सभोवतालचा समुद्र सध्या रशियन आणि चिनी जहाजांनी व्यापलेला आहे. हेच कारण देत ट्रम्प यांच्याकडून ग्रीनलँडचा ताबा मिळवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, नेदरलँड, फिनलंड, नॉर्वे आणि स्वीडन या युरोपीय देशांनी आपल्या सैन्य तुकड्या ग्रीनलँडमध्ये पाठवल्या आहेत. ग्रीनलँडला पाठिंबा दर्शवण्यासाठीच हे पाऊल उचलण्यात आले आहे. ट्रम्प हे कोणाचेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसून, त्यामुळे त्यांनी या सर्व युरोपीय देशांवर दहा टक्के आयात शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. एक फेब्रुवारीपासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. अमेरिकेचा ग्रीनलँडच्या खरेदीचा करार पूर्णत्वास गेला नाही, तर एक जूनपासून हे शुल्क 25 टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल, अशी थेट भीतीही त्यांनी दाखवली आहे. एवढेच नव्हे, तर जागतिक शांतता आणि सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी या देशाने स्वतःच निर्माण केलेली धोकादायक परिस्थिती लवकरात लवकर संपवणे गरज आहे. अन्यथा कठोर उपाययोजना केल्या जातील, अशी उघड धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. रशिया किंवा चीन हे ग्रीनलँड ताब्यात घेण्याची शक्यता असून, त्यांना रोखण्यासाठी हा भूभाग अमेरिकेच्या ताब्यात असणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद ट्रम्प यांनी केला आहे. वास्तविक हे दोन देश ग्रीनलँड ताब्यात घेतील, असा कोणताही पुरावा नाही, अथवा तसा इरादा या देशांनी व्यक्तदेखील केलेला नाही. वस्तुतः ग्रीनलँड अमेरिकेलाच हवा आहे आणि त्यासाठी ट्रम्प यांनी हा बागुलबुवा निर्माण केला आहे. खरे तर ग्रीनलँड हा कित्येक वर्षे डेन्मार्कचा अधिकृत भूभाग मानला जात असे. 1953 मध्ये ग्रीनलँडला डेन्मार्कचा भाग म्हणून मान्यता मिळाली. तेथील 56 हजार नागरिकांपैकी 19 टक्के हे 'इन्युइट' आहेत. आर्क्टिक किंवा उत्तर ध्रुवीय प्रदेशातील स्थानिक लोकांचा गट, जो प्रामुख्याने उत्तर कॅनडा, अलास्का आणि ग्रीनलँडमध्ये राहतो, त्यांना 'इन्युइट' असे संबोधले जाते. ते पारंपरिकरीत्या शिकार, मासेमारी आणि फरचे कपडे बनवणे ही कामे करतात. डेन्मार्कने 1978 साली ग्रीनलँडच्या नागरिकांना 'होमरूल' किंवा मर्यादित स्वातंत्र्य घेण्याविषयी सार्वमत घेण्याची मान्यता दिली. 2008 साली अशाप्रकारे सार्वमत घेतले गेले, तेव्हा ग्रीनलँडमधील 76 टक्के लोकांनी 'होमरूल'ला पसंती दिली. याअंतर्गत ग्रीनलँडमध्ये स्वतंत्र संसद उभारण्यात आली. परराष्ट्र धोरण, चलन आणि संरक्षण यांचा अपवाद करता इतर बहुतेक क्षेत्रांबाबतचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य डेन्मार्कने ग्रीनलँडला बहाल केले आहे. एकूण ग्रीनलँड हा स्वतंत्र देश नसला, तरी तो डेन्मार्कचा स्वायत्त प्रांत मानला जातो. ग्रीनलँड ताब्यात घेण्याची कल्पना 1867 मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष अँड्र्यू जॉन्सन यांनी प्रथम मांडली होती. 1910 मध्ये तेव्हाचे अध्यक्ष विल्यम टॅफ्ट यांनीही ग्रीनलँड घशात घालण्याचा प्रस्ताव मांडला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अमेरिकेने ग्रीनलँडचा ताबा घेतला होता. अन्य कोणत्याही देशाला तेथे येण्यापासून रोखले होते. त्यानंतर डेन्मार्ककडे ग्रीनलँडच्या खरेदीचा प्रस्ताव सादर केला होता. आता हे बेट हातात आल्यास आर्क्टिकजवळून अटलांटिक पॅसिफिक सागरभ्रमण अमेरिकेच्या दृष्टीने सोपे होईल. यामुळे रशियावर लक्ष ठेवण्यासाठी अमेरिकेला अधिक तळ उभारता येतील. शिवाय हे बेट खनिजे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. ग्रीनलँड, डेन्मार्क येथील नेते आणि अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्यातील वाटाघाटीतून ग्रीनलँडचा प्रश्न सुटू शकलेला नाही. ट्रम्प हे 'नाटो'सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेची पर्वा करत नाहीत. रशिया-युक्रेन प्रश्नावरून अमेरिका व 'नाटो' यांचे संबंध अगोदरच बिघडलेले आहेत आणि त्यात आता ग्रीनलँडच्या गुंत्याची भर पडली आहे. आपले स्वार्थी हेतू साध्य करण्यासाठी धमक्या देणे, हल्ले करणे अथवा वाटेल तसे शुल्क लादून व्यापारयुद्ध छेडणे, ही ट्रम्प यांची नीती आहे. 21व्या शतकातील ट्रम्प हे नवे साम्राज्यशहा असून, त्यांना रोखण्याची आवश्यकता आहे.

# बापाची 'भूक' ठरली काळ!

## जेवणावरून झालेल्या वादात पित्याची हत्या करणाऱ्या मुलास जन्मठेप

▸विदर्भ केसरी। यवतमाळ :

**जेवणाचे कारणावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर हत्येत करून आपल्याच जन्मदात्या वडिलांना यमसदनी धाडणाऱ्या नराधम मुलाला यवतमाळच्या सत्र न्यायालयाने जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली आहे. विनोद दादाराव खडके (वय ३५, रा. मनदेव) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. पितृत्वाला काळिमा फासणाऱ्या या घटनेचा निकाल २० जानेवारी २०२६ रोजी लागला.**





■ **नेमकी घटना काय होती?**

ही थरारक घटना ४ जुलै २०२१ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मनदेव येथे घडली होती. आरोपी विनोद खडके हा त्याचे वडील दादाराव खडके यांना जेवायला बोलावण्यासाठी गावातील जिल्हा परिषद शाळेच्या वरच्या मजल्यावर गेला होता. मात्र, वडिलांनी जेवण करण्यास नकार दिला. याचा राग अनावर झाल्याने विनोदने आपल्या वडिलांना फरफटत रस्त्यावर आणले आणि लाकडी झिलपीने त्यांच्या डोक्यावर जबर वार केले. इतकेच नव्हे तर, लाथाबुक्क्यांनी छातीवर व पोटावर अमानुष मारहाण करून त्यांची हत्या केली. यावेळी मध्यस्थी करणाऱ्या आईलाही त्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली होती.

विद्यमान न्यायालयाने पुराव्यांची आणि साक्षीदारांची पडताळणी करून आरोपी विनोदला खालीलप्रमाणे शिक्षा ठोठावली: कलम ३०२ (खून) जन्मठेप१,०००/- रुपयेदंड न भरल्यास-६ महिने सश्रम कारावास

### भक्कम पुराव्यांनी आरोपीला केली जन्मठेप

■ या घटनेचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक किशोर बळीराम जुनघरे यांनी अत्यंत कौशल्याने केला होता. त्यांनी गोळा केलेले प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, डॉक्टरांचा अहवाल आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील श्री. मंगेश गंगलवार यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

### यांनी बजावली महत्त्वाची भूमिका

■ साक्षीदार पडताळणी आणि न्यायालयीन प्रक्रियेत यवतमाळ ग्रामीणचे पोलीस निरीक्षक सुनील नाईक, कोर्ट पैरवी अधिकारी महिला पोलीस हवालदार नीता खडसे (ब.नं. ५४७) आणि पोलीस कॉन्स्टेबल वसंत बोरकर (ब.नं. १३४३) यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. पुराव्यांची साखळी भक्कम असल्याने आरोपीला आपल्या कृत्याची योग्य शिक्षा मिळाली आहे.

# भरधाव वाहनाच्या धडकेत दोन तरुण जागीच ठार

▸विदर्भ केसरी। उमरखेड :

एका भरधाव वाहनाने धडक दिल्यामुळे दुचाकीवरील दोन तरुण जागीच ठार झाले. हा भीषण अपघात उमरखेड-पुसद मार्गावरील कुपटी गावानजीक दत्त मंदिर परिसरात १९ जानेवारीच्या रात्री ९ वाजता घडला.



विनायक काळे (३२) आणि चंद्रकांत कऱ्हाळे (२२) दोघेही रा. अंबाळी अशी या अपघातात ठार झालेल्या युवकांची नावे आहेत. ते दोघे सोमवारी काही कामानिमित्त उमरखेड येथे आले होते. काम आटोपल्यानंतर ते दुचाकीने (एमएच २९ सीएच ४०३७) आपल्या अंबाळी या गावाकडे परत निघाले होते. मात्र कुपटी गावाजवळच्या दत्त मंदिर परिसरालगत एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. रात्रीच्या अंधारात ते दोघेही रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावर पडले होते. काही वेळात ही बाब रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या इतर वाहनधारकांच्या लक्षात आली. त्यातीलच परशराम काळे यांनी या घटनेची माहिती पोफाळी पोलिसात दिली. मंगळवारी २० जानेवारी रोजी दोन्ही युवकांचे उमरखेडच्या उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर अंबाळी येथे शोककूल वातावरणात दोघांवरही अंत्यसंस्कार करण्यात आले.

■ **अवघ्या एका दिवसापूर्वी तालुक्यातीलच रुपाळा नागापूर येथे दोन युवकांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. या दु:खातून तालुका सावरत नाही तोच आता अंबाळी येथील दोन उमद्या तरुणांचा अपघाती मृत्यू झाला. रुपाळातील किंकाळ्या थांबत नाही तोच आता अंबाळी गावावरही दु:खावेग ओढविला आहे. एकापाठोपाठ घडलेल्या या दोन हृदयद्रावक घटनांनी रुपाळा नागापूर आणि अंबाळी या गावांसह संपूर्ण तालुक्यात तीव्र शोकसंवेदना व्यक्त होत आहेत.**

# अल्पवयीन बालिकेवर अत्याचार : आरोपीस २० वर्षे सक्तमजूरी

▸विदर्भ केसरी। दारव्हा

लग्नाचे आमिष दाखवून १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला दारव्हा सत्र न्यायालयाचे जिल्हा व सत्र न्यायाधीश संजीवकुमार नरवाडे यांनी २० वर्षे सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे. शाम माणिक ढोले (रा. कोपरा, ता. आर्णी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या खळबळजनक निकालामुळे परिसरात अत्याचार करणाऱ्या प्रवृत्तींना मोठा धडा मिळाला आहे.

१४ मे २०२१ रोजी आरोपी शाम ढोले याने एका १४ वर्षीय मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले होते. सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात बनवाडी येथे भाड्याची खोली घेऊन त्याने पीडितेवर वारंवार लैंगिक अत्याचार केले. पीडितेच्या वडिलांनी तक्रार दिल्यानंतर आर्णी पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे सातारा येथून ५ जून २०२१ रोजी मुलीची सुटका केली आणि आरोपीला बेड्या ठोकल्या.जामिनावर असताना आरोपी फरार झाला होता, मात्र न्यायालयाने अटक वारंट काढल्यानंतर पोलिसांनी त्याला पुन्हा शोधून कोठडीत पाठवले. सरकारी पक्षातर्फे एकूण ८ साक्षीदार तपासण्यात आले. पीडितेची साक्ष आणि वैद्यकीय पुरावे या प्रकरणात अत्यंत महत्त्वाचे ठरले. न्यायालयाने आरोपीने भरलेली दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, शासनाच्या 'मनोधैर्य' योजनेतून पीडितेला आर्थिक मदत देण्याचे आदेशही पारित करण्यात आले आहेत. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे ॲड. अंकुश एस. देशमुख यांनी अत्यंत प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजानन भगत (पो.स्टे. आर्णी) यांनी मोलाचे सहकार्य केले.आरोपीला भा.द.वि. चे कलम ३६३ मध्ये ३ वर्षे व ५ हजार दंड, कलम ३६६ मध्ये ५ वर्षे व ५ हजार रू दंड, कलम ३७६ (२) मध्ये १० वर्षे व १० हजार रू दंड, ३७६ (२) (न) मध्ये १० वर्षे व १० हजार रू दंड, तसेच बाल लैंगिक अत्याचार कायद्याचे कलम ४ मध्ये २० वर्षांची सजा व २५ हजार रू दंड तसेच कलम ६ मध्ये २० वर्षांची शिक्षा व २५ हजार रू दंडाची शिक्षा वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश संजीवकुमार नरवाडे, दारव्हा यांनी आरोपीला दिली

# ...तर समृद्धी महामार्ग रोखणार!

▸विदर्भ केसरी।नाशिक :

नाशिक-पुणे जलदगती रेल्वे मार्गाच्या मूळ आराखड्यात बदल करून तो शिर्डीच्या दिशेने वळवण्याच्या निर्णयाविरोधात ३१ जानेवारी रोजी समृद्धी महामार्ग आणि नाशिक-पुणे महामार्गावर एकाचवेळी रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा सिन्नर तालुक्यातील शेतकरी व रेल्वे कृति समितीने दिला आहे.

नाशिक-पुणे रेल्वे मार्गाची मूळ संरेखना रद्द करून नवीन पुणे-अहिल्यानगर-निंबळक-पुणतांबा-पिंपळगाव-साईनगर शिर्डी-नाशिक असा मार्ग निश्चित केला जात असल्याची माहिती समोर आल्यापासून मूळ मार्गावरील भागात अस्वस्थता आहे. नाशिक-पुणे रेल्वेचा मूळ मार्ग नारायणगाव येथील आंतरराष्ट्रीय खगोल निरीक्षण अर्थात 'जीएमआरटी' प्रकल्पाजवळून जात होता. रेल्वे मार्गामुळे या प्रकल्पाच्या कामात अडचणी येण्याची शक्यता लक्षात घेऊन हे क्षेत्र टाळून नवीन पर्यायी मार्ग निश्चित केल्याचे सांगितले जाते. तथापि, नाशिक-पुणे जलदगती रेल्वे मार्ग नाशिक-सिन्नर-अकोले-संगमनेर-नारायणगाव-राजगुरूनगर-चाकण या मूळ व सरळ मार्गानेच राबविण्यात यावा, या मागणीसाठी मागील काही दिवसांपासून उपरोक्त भागात आंदोलनाचे सत्र सुरू आहे.

नाशिक व पुणे या दोन प्रमुख औद्योगिक शहरांच्या विकासासाठी हा रेल्वे मार्ग मूळ मार्गानेच होणे अत्यंत आवश्यक असल्याचा आग्रह धरला जात आहे. या मागणीसाठी कृति समिती स्थापन करण्यात आली. या प्रकल्पासाठी आतापर्यंत शासनाने मोठा खर्च केला आहे. अनेक शेतक-यांच्या जमिनीचे अधिग्रहणही झाले. त्यामुळे आता माघार न घेता रेल्वे प्रकल्प सरळ व मूळ मार्गानेच व्हावा, अशी भूमिका मांडली जात आहे. सिन्नर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट घेऊन निवेदन दिले. या रेल्वे मार्गासाठी सिन्नर तालुक्यातील अनेक शेतक-यांच्या जमिनी आधीच संपादित करण्यात आल्या असून काहींना मोबदला देखील देण्यात आला आहे. भूसंपादन प्रक्रिया सुरू झाल्याने शेतक-यांना विकासाची अपेक्षा होती.

# महागाव नगरीत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा पादुका दर्शन सोहळा

▸विदर्भ केसरी। महागाव प्रतिनिधी, शेरखान पठान

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणिजधाम यांचा पादुका दर्शन सोहळा व प्रवचन दर्शन सोहळा रविवार दिनांक : 18 जानेवारी 2026 रोजी महागाव शहरातील क्रीडा संकुल, नवीन पोलीस वसाहतीच्या मागे, आठवडी बाजार समोर, महागाव शहर ,जिल्हा यवतमाळ पश्चिम येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी उमरखेड महागाव चे आमदार मा. श्री किशनराव वानखेडे साहेब,माजी आमदार राजूभाऊ नगरधने साहेब,महागाव च्या नगराध्यक्षा सौ.सुनंदाताई दिलीप कोपरकर, उमरखेड च्या नगराध्यक्षा सौ.तेजश्री संतोषराव जैन,मा.श्री तातू भाऊ देशमुख साहेब,श्री शैलेश कोपरकर साहेब,उमरखेडचे सदस्य अविनाश अग्रवाल साहेब,महागाव पोलीस



उपनिरीक्षक श्री निळे साहेब,उमरखेड नगरसेवक श्री गजेंद्र ठाकरे साहेब, राजू कवाने साहेब, राजू शिंदे साहेब, सामाजिक कार्यकर्ते अंबादास धुळे साहेब, पश्चिम विदर्भ पिठाचे पीठ प्रमुख श्री कुंडलिकराव वायभासे साहेब,पीठ सहप्रमुख संजय खंडागळे साहेब,जिल्हा निरीक्षक गोविंद उपासे,पीठ समितीचे अमर ईधोळ, माधव घोडे, वामनराव मोटे, प्रवीण कदम, महागाव तालुका अध्यक्ष रामदास ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जगद्गुरुश्रींच्या सिद्ध पादुका नगराध्यक्षा सौ. सुनंदाताई दिलीप कोपरकर यांच्या निवासस्थानी होत्या. त्यांनी खूप सुंदर व्यवस्था केली होती.या वेळी महागाव शहरातून जगद्गुरुश्रींच्या सिद्ध पादुकांची सजवलेल्या रथा मधून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.शोभा यात्रेमध्ये अनेक देखावे सादर करण्यात आले. त्यामध्ये निशानधारी महिला,निशानधारी पुरुष, कलशधारी महिला, डफली पथक,बँड पथक,भजनी मंडळ,राम पंचायतन आदी पथकांचा समावेश होता. पादुकांचे संतपिठावर आगमन झाल्यानंतर जगद्गुरुश्रींची सामुदायिक आरती संपन्न झाली. रथांमधील यजमान बोरकर संत पिठाजवळील यजमान सतीश उरकुडे हे सपत्नीक होते.सामाजिक उपक्रमांतर्गत निराधार महिला लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते 13 शिलाई यंत्राचे वाटप करण्यात आले. ज.न.म. प्रवचनकार सौ.आशाताई राऊत यांचे सुमधुर असे प्रवचन संपन्न झाले. ताईंनी प्रवचन सेवेच्या माध्यमातून उपस्थित सर्व भक्तगणांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर गुरु पूजन, उपासक दीक्षा,जगद्गुरुश्रींचे अमृततुल्य ऑनलाईन प्रवचन,सिद्ध पादुका दर्शन सोहळा,रक्तदान शिबिर,पुष्पवृष्टी, सांगता आरती असे विविध कार्यक्रम संपन्न झाले. याच कार्यक्रमात 231 भक्तगणांनी उपासक दीक्षा घेतली. कार्यक्रमास 5000 ते 6000 हजार भाविकांची उपस्थिती होती. दिवसभर येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भारत भाऊ वानखेडे व अभिलाष कदम यांनी केले तर सर्वांचे आभार जिल्हाध्यक्ष गजानन गरवारे यांनी मानले.

हा नयनरम्य सोहळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा समिती,तालुका समिती,सेवा केंद्र समिती , आरती केंद्र समितीचे पदाधिकारी,युवासेना, हिंदू संग्राम सेना, महिला सेना, प्रवचनकार, गुरु सेवक ,प्रोटोकॉल अधिकारी, आजी व माजी पदाधिकारी जिल्ह्यांतील भक्तगण गुरुबंधू व गुरु भगिनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सन्मान सोहळा संपन्न

▸विदर्भ केसरी। दर्यापूर

तालुक्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य सहकारी संस्था असलेली दि दर्यापूर तालुका खरेदी विक्री संघाचे वतीने १६ जानेवारी रोजी दर्यापूर नगर परिषद निवडणुकीत विजयी झालेल्या नगराध्यक्षा सौ मंदाकिनीताई सुधाकरराव भारसाकळे व नवनिर्वाचित नगर सेवक व नगर सेविका यांचा सन्मान सोहळा संपन्न पार पडला.




या कार्यक्रमाला अध्यक्ष जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक सुधाकर पाटील भारसाकळे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड श्रीरंग पाटील अरबट, नगर परिषद नगराध्यक्षा सौ मंदाकिनीताई सुधाकरराव भारसाकळे, उपाध्यक्ष अहमद खा सादत खा,जिल्हा महिला काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कांचनमाला गावंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे, उपसभापती राजू पाटील कराळे,युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव नितेश वानखडे, माजी पंचायत समिती सभापती प्रदीपबापू देशमुख, नगर परिषद स्वीकृत सदस्य बाबाराव पाटील बरवट,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजाननराव जाधव, उपाध्यक्ष प्रभाकर कोरपे,सचिव मधसुदन वाचे,सहसचिव संजय चांदूरकर आदी उपस्थित होते. यावेळी एकवीरा स्कूलचा संगीत विभागाने प्रा तेजस कडू यांच्या नेतृत्वात बहारदार स्वागतगीत सादर केले. सहभागी विद्यार्थ्यांचे पाहुण्यांनी कौतुक करत त्यांचा सन्मान केला.

याप्रसंगी दर्यापूर नगर परिषद नगराध्यक्षा सौ मंदाकिनीताई सुधाकरराव भारसाकळे, नवनिर्वाचित नगरसेवक नगर परिषद उपाध्यक्ष अहेमद खा सादत खा.काँग्रेस गटनेता रामेश्वरराव चव्हाण,भाजपा गटनेता दिनेश जानराव पारडे, नगरसेवक राहुल सुरेश बैताळे,वंदना विठ्ठलसिंह सोलंकी,मुनिफा बी अय्युब शाह,कविता दिलीप गवई,रोशन मनोहरराव कट्यारमल,विजया भरत शुक्ला,रामेश्वर फकीरचंद तांडेकर,रेखाताई दिलीपराव चव्हाण,वर्षा विनोद बोरेकर,समीना परविन सैय्यद नदीम,शेख नसीब शेख इस्माईल उर्फ वसीम शेख,मंदा दादा इंगळे,मंगला राजाभाऊ तराळे,मयुर हिम्मत लांडे, स्नेहा शिवाजी देशमुख,सुनीता संजय चव्हाण प्रवीणा नितीन गावंडे, स्वीकृत सदस्य ईश्वरभाऊ बुदीले,रामेश्वरजी मालपाणी,बाबारावजी बरबट आदींचा सत्कार करण्यात आला.

तसेच नागरी सहकारी पतसंस्था आणि खरेदी विक्री संघ कर्मचारी पतसंस्था यांच्या वतीने नगराध्यक्षा सौ मंदाकिनीताई सुधाकरराव भारसाकळे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक संचालक भैय्या उर्फ संजय हिम्मतराव टेकाडे,अमोल सुभाषराव देशमुख, संतोष रामदास भोंडे,बाळासाहेब उर्फ चंद्रकांत तुळशिराम टोळे,अमोल शालिकराम धर्माळे, प्रा. डॉ.सुशिल पांडुरंगजी गावंडे,दिनकरराव विठ्ठलराव गायगोले,मदनराव हिम्मतराव बायस्कार,राजेंद्र किसनराव नागपुरे,कैलास मोतीराम अघडते,प्रशांत मधुकरराव देशमुख, संचालिका रेखाताई राजेंद्र गावंडे,वर्षाताई नरेंद्र ब्राम्हणकर,व्यवस्थापक राजेंद्र मनोहरराव गावंडे आदी उपस्थित होते. या कार्यकमाचे प्रास्ताविक खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापन राजेंद्र गावंडे यांनी केले तर संचलन प्रा धनंजय देशमुख व आभार व्यक्त मधुसूदन संस्थेचे सचिव मधुसूदन पाचे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खरेदी विक्री संघाचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला सहकार क्षेत्रातील अनेक संस्थेचे पदाधिकारी व तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## व्यक्तीची गळफास लावून आत्महत्या

■ कळंब : कोठा येथील आशिफ अहेमद शहा (वय ४१, रा. कोठा) याने सोमवारी (ता. १९) सकाळी सात वाजता घरातील टिन फाट्याला दोर बांधून गळफास लाऊन आत्महत्या केली. ही बाब त्याच्या पत्नीच्या लक्षात येताच तिने आरडाओरड केल्यानंतर लोकांनी धाव घेऊन त्याला कळंब येथील ग्रामीण रुग्णालयात भरती केले. यावेळी डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. फिर्यादी अल्ताफ यासीन शहा या चुलत भावाने पोलिस ठाणे कळंबला रिपोर्ट दिला. ठाणेदार राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनात पोलिस हेड कॉन्स्टेबल वाघाडे पुढील तपास करीत आहेत.

**महत्त्वाचे**

## विवेकानंद विद्यालयाचा साई येलमलवार राष्ट्रीय स्तरावर तृतीय स्थानी

**विदर्भ केसरी। यवतमाळ:प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद विद्यालयाचा वर्ग १० चा विद्यार्थी साई प्रवीण येलमलवार याची १७ वर्षाआतील मुलांच्या गटामध्ये महाराष्ट्र संघामध्ये निवड झाली. ६९ व्या राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धा मारणेर, राजस्थान येथे नुकत्याच पार पडल्या आणि उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्र संघाने या स्पर्धेमध्ये तृतीय स्थान पटकावले. विवेकानंद विद्यालयात आठवी मध्ये प्रवेश घेतल्यानंतर साई ला नेटबॉल खेळाची ओळख झाली व त्यामध्ये त्याची आवड आणि कौशल्य वाढत गेले. तो नेटबॉल या खेळाचा नियमित सराव विद्यालयाच्या मैदानावर करतो. सत्र २०23 मध्ये भंडारा येथे आयोजित शालेय राज्यस्तर नेटबॉल स्पर्धेमध्ये १७ वर्षाआतील मुलांच्या गटात विद्यालयाच्या संघाने तृतीय स्थान पटकावले होते. त्याचे वडील शेतीकाम करतात. परिस्थिती जेमतेम असल्याने त्यांनी साई ला शासकीय वसतिगृहात ठेवले व विवेकानंद विद्यालयात प्रवेश घेतला. शाळेच्या क्रीडाशिक्षकांच्या मार्गदर्शनात व स्वतःच्या मेहनतीतून आपले त्याने आपले क्रीडा कौशल्य विकसित करून स्वतःचे नाव राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचविले. शाळेचे क्रीडा शिक्षक प्रफुल्ल गावंडे व मन्साराम सावलकर त्याला नियमित मार्गदर्शन करतात. साईच्या या यशाबद्दल विशुद्ध विद्यालय संस्थेचे अध्यक्ष विनायक दाते, सचिव विजय कासलीकर, सदस्य सुषमा दाते व संचालक मंडळ सदस्यांनी कौतुक केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक अलोणी, पर्यवेक्षक विवेक कवठेकर, वर्गशिक्षक संतोष पवार तसेच सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.



## वाहनाच्या धडकेत पादचारी जखमी

**विदर्भ केसरी।यवतमाळ**

शहरातील संविधान चौक ते नेताजी भवन रोडवर एका अज्ञात वाहन चालकाने पादचाऱ्याला धडक देऊन जखमी केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी गणेश रमेश राऊत (३६, रा. घाटंजी) हे १८ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास राहुल पानटपरी जवळून पायी जात असताना हा अपघात झाला. अज्ञात चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीस जोराची धडक दिली, ज्यामध्ये ते जखमी झाले. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध कलम २८१, १२५(ब) भान्यास अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## तरुणाला मारहाण

**विदर्भ केसरी। दारव्हा:**

येथील किल्ला वॉर्ड परिसरात दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत या कारणावरून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. फिर्यादी हासीन खान मुस्लिम खान (२२) याला आरोपी नवाब खान (२७) आणि नासीर खान (३५) यांनी १८ जानेवारी रोजी सकाळी गाठले. फिर्यादीने पैसे देण्यास नकार देताच आरोपींनी त्याच्याशी वाद घालून शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

# अखेर पहिली आंतरराज्य बस धावली

### ढाणकी-किनवटमार्गे 'आदिलाबाद' सेवा सुरू! पालकमंत्री संजय राठोड यांच्या पाठपुराव्याला यश; माधवराव मिटकरे प्रवासी मंडळाचा लढा फळाला

**विदर्भ केसरी। ढाणकी (प्रतिनिधी): मिलिंद चिकटे**

**उमरखेड आगाराच्या इतिहासात प्रथमच आंतरराज्य बस सेवेचा श्रीगणेशा झाला असून, आज दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी उमरखेड-ढाणकी-किनवट-आदिलाबाद या बसला हिरवा कंदील दाखवण्यात आला. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यवतमाळचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या पत्राची दखल घेतल्याने ही सेवा सुरू झाली असून, यामुळे ढाणकी परिसरातील प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.**



उमरखेड आगारातून तेलंगणा राज्यासाठी थेट बस सेवा नसल्याने प्रवाशांचे हाल होत होते. ही बाब लक्षात घे ऊन पालकमंत्री संजय राठोड यांनी प रिवहन मंत्र्यांकडे विशेष पाठपुरावा केला होता. अखेर ही मागणी मान्य झाली असून, उमरखेड ते आदिलाबाद अशी आंतरराज्य फेरी सुरू झाल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नातही भर पडणार आहे.

आज सकाळी ही बस ढाणकी ब सस्थानकावर पोहोचताच प्रवाशांनी व स्थानिक नागरिकांनी जल्लोष केला. बसला झेंडूच्या फुलांनी आणि उसाच्या धाड्यांनी आकर्षकरीत्या सजवण्यात आले होते. यावेळी चालक शेख फारूक व वाहक रवी बाळसकर यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन 'माधवराव मिटकरे प्रवासी मंडळा'च्या व तीने करण्यात आले होते. युवा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष गजानन आजेगावकर यांच्या हस्ते चालक-वाहकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ढाणकी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोसले, उपाध्यक्ष शेख शाहरुख, सचिव शेख इरफान, प्रशांत आरेवाड, बंटी फुलकोडवार, शेख जब्बार उपस्थित होते. तसेच प्रवासी मंडळाचे सचिव हिरासिंह चव्हाण, उपाध्यक्ष नाथा पाटील, सौरभ मिटकरे, शैलेश साखरे, ढाणकी बसस्थानक प्रमुख सुरेश मोरे आणि प्रदीप गायकवाड यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

उमरखेड प्रस्थान: स काळी ७:३० वाजता मार्ग: ढाणकी - टेबुरदरा - किनवट - अंबाडी - पिपळगावमार्गे आदिलाबाद.

मा धवराव मिटकरे प्रवासी मंडळाचे अध्यक्ष शेख इरफान यांनी या सेवेबद्दल उमरखेड आगार व्यवस्थापकांचे आभार मा नले. ही बस सेवा सुरू झाल्याने व्यापारी, विद्यार्थी आणि सामान्य प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

> ■ आज एका वर्षापासून आम्ही प्रवासी संघटना वारंवार पाठपुरा करत होतो विभाग नियंत्रक व पालकमंत्री व आमदार खासदार यांना सर्वस्व भेटून निवेदन देऊन उमरखेड ते आदीलाबाद आंतरराज्य बस सेवा सुरू करा म्हणून सारखा पाठपुरावा माधवरा मिटकरे प्रवाशी मंडळ पाठ पुरावा करीत होते आज मागणीला यश मिळाले
> -माधवराव मिटकरे
> अध्यक्ष शेख इरफान

## तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचा निधी अनियंत्रित

### गुरुदेव युवा संघाकडून सीएस कार्यालयावर संशय

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ : तंबाखू नियंत्रण मुक्तीसाठी आलेल्या निधीचा योग्य विनियोग होत नसल्याचा आरोप गुरुदेव संघाकडून होत आहे. शासनाने तंबाखू मुक्तीसाठी चांगली पावले उचलली असली तरी त्याला राबवणारी पावले मात्र उदासीन असल्याचे गेडाम यांचे म्हणणे आहे. या सर्वांमध्ये जिल्हा शल्य चिकित्सकांची भूमिका संशयास्पद असून खाजगी दवाखान्यांची मनमानी असो की राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक हे कायम चुप्पी साधून का असतात,असा प्रश्न गेडाम यांनी उपस्थित केला आहे.

जिल्हयात तंबाखू नियंत्रण कार्यक्रमासाठी २०२५-२६ करिता 19.. लाख .21.हजार रुपयांचा निधी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय व सामान्य रुग्णालयाला प्राप्त झाला. मात्र प्रत्यक्षात कार्यक्रमाची अंमलबजावणी होत नसून केवळ कागदपत्रे पाठपुरावे सादर करण्यातच जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय हुशार आहे,असा आरोप गेडाम यांनी लगावला. जिल्ह्यातील या अनागोंदी कडे आरोग्य मंत्री तसेच आयुक्तांनी लक्ष घालावे अन्यथा गुरुदेव संघाकडून तीव्र आंदोलन उभे केले जाईल असा इशारा देण्यात आला आहे. सन २०२५- २६ करिता जिल्हाभरातील तंबाखू नियंत्रण कार्यक्रमासाठी 21. लाख , 21,हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला असून त्या दृष्टीने योग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी होत नसल्याचे वास्तव आहे.जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचा पूर्णपणे फज्जा उडाला असून तंबाखू मुक्तीसाठी सर्वात आधी शासनाने आपल्याच कार्यालयांची उलट तपासणी करावी,कर्तव्यावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना आधी तंबाखूमुक्त करावे आणि कार्यक्रमांना अमलात आणावे,अशी मागणी गेडाम यांनी केली आहे.




**लोकांच्या पैशांची नासाडी करू नका,भ्रष्टाचार कमी करा अन्यथा गाठ गुरुदेवशी आहे असा सज्जड दमदेखील त्यांनी भरला.**

## शिवमहापुराण कथेने जवळा दुमदुमले

**विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी : बबिता शिवणकर**

जवळा परिसरात सध्या भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, शुक्रवार, १६ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय भागवत कथा प्रवक्ता तथा गौवत्स सरस कथा आचार्य प.पु. शिरीष महाराज बारी (हरिद्वार) यांच्या सुमधुर व ओघवत्या वाणीतून संगीतमय श्री शिवमहापुराण कथेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या अध्यात्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या पावन प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत सौ. निताताई राजेश आडे यांच्या वतीने लोणी–जवळा सर्कलमधील गरजू रुग्णांसाठी एका सुसज्ज रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. अध्यात्मिक कार्यक्रमाला सामाजिक सेवेची जोड देत राबविण्यात आलेला हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. कथा दरम्यान प.पु. शिरीष महाराज बारी यांनी शिवमहापुराणातील विविध प्रसंगांचे रसाळ व प्रभावी कथन केले. त्यांच्या प्रवचनाला ऐकण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. केवळ आध्यात्मिक प्रबोधनापुरते मर्यादित न राहता, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी या उद्देशाने 'चालता-फिरता दवाखाना' म्हणून ही रुग्णवाहिका परिसराला समर्पित करण्यात आली. ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी तसेच वाहतुकीअभावी कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, या भावनेतून सौ. निताताई राजेश आडे यांनी हा पुढाकार घेतला आहे. ही रुग्णवाहिका लोणी–जवळा सर्कलमधील नागरिकांसाठी 'संजीवनी' ठरेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या स्तुत्य उपक्रमामुळे जवळा परिसरात सौ. निताताई आडे व आयोजक समितीचे सर्वत्र कौतुक होत असून, अध्यात्मिक सोहळ्याला सामाजिक सेवेची जोड मिळाल्याने या कार्यक्रमाची उंची अधिकच वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.



## औद्योगिक प्रकल्पांची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढा : जिल्हाधिकारी विकास मीना

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

जिल्ह्यात औद्योगिक विकासाला गती मिळणे आवश्यक असून, औद्योगिक प्रकल्पांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी आज दिले.

जिल्हाधिका-यांनी एमआयडीसी व महावितरण आदी यंत्रणांकडे उद्योगांशी संबंधित विविध प्रकरणांचा सविस्तर आढावा आज महसूलभवनात घेतला. यावेळी त्यांनी औद्योगिक वसाहतीतील रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा तसेच अन्य पायाभूत सुविधांची माहिती घेतली व प्रलंबित कामांची सद्य:स्थिती जाणून घेत वेळेत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.




उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणी तात्काळ सोडविण्यास प्राधान्य द्यावे. उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. औद्योगिक क्षेत्रातील वीजपुरवठा सुरळीत ठेवावा. खंडित वीजपुरवठ्यामुळे उद्योगांवर होणारा परिणाम लक्षात घेता भविष्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यावेळी औद्योगिक क्षेत्रातील पोलीस चौकीसंदर्भातही चर्चा करण्यात आली. उद्योगांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा तात्काळ करण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या. मारेगाव, नेर, पुसद व उमरखेड येथील एमआयडीसी क्षेत्रांतील लघुउद्योगांच्या समस्यांचा नियमित आढावा घेण्यात यावा, तर कळंब येथील प्रलंबित कामे एका महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

या आढावा बैठकीस एमआयडीसी उद्योग संघटनेतील एन. सी. सुराणा, संजय बोधरा, आनंद भुसारी, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राम लंके, महाव्यवस्थापक सुनील गरुड,उपअभियंता नरेंद्र विंचुरकर, कनिष्ठ अभियंता चैताली गुडदे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## मद्यधुंद चालकाचा राडा...

**विदर्भ केसरी। दिग्रस:**

एका मद्यधुंद वाहन चालकाने अपघातानंतर पोलिसांनाच धमकावून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी अश्विन रामभाऊ राऊत याने मद्यधुंद अवस्थेत आपली कार निष्काळजीपणे चालवून दुसऱ्या एका वाहनास धडक दिली. पोलीस कॉन्स्टेबल सुनील जाधव घटनास्थळी पोहोचले असता, आरोपीने त्यांची कॉलर पकडून 'तुला पाहून घेईन, मला नेणारा तू कोण?' अशी धमकी दिली. तसेच पोलिसांना शिवीगाळ करत सस्पेंड करण्याची धमकी दिली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

## खोपडी (बु.) परिसरात वाघाची दहशत

### रेडा ठार, गावात भीतीचे वातावरण : नुकसानग्रस्ताला भरपाई द्या

**विदर्भ केसरी। दारव्हा**

दारव्हा तालुक्यातील खोपडी (बु.) गाव व परिसरात वाघाच्या मुक्त संचारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सायंकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास गावाजवळ वाघ दिसून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. पंजाब राठोड, दिनेश चव्हाण, मारोती खंडाळकर, संदीप करोडदेव यांच्यासह पाच ते सहा नागरिकांनी वाघ प्रत्यक्ष पाहिल्याची माहिती दिली आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. दरम्यान, याच रात्री उकडा आडे यांच्या मालकीचा रेडा (हाल्या) गावालगतच्या शेतात वाघाच्या हल्ल्यात ठार झाला. सदर रेडा वाघाने पूर्णपणे फस्त केल्याचे निदर्शनास आले. या घटनेनंतर शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण अधिक तीव्र झाले असून अनेक नागरिकांनी रात्री घराबाहेर पडणे टाळले आहे. या घटनेची माहिती देऊनही वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दुसऱ्या दिवशी उशिरा दाखल झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. केवळ पाहणी करून कोणतीही ठोस उपाययोजना न करता कर्मचारी निघून गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




> ■ वाघाच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी, मजूर तसेच लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून संपूर्ण गाव दहशतीखाली आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने वाघाचा बंदोबस्त करावा, परिसरात पिंजरा लावावा तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे

## रस्त्यासाठी शाळकरी विद्यार्थ्यांचे रस्त्यावर आंदोलन

**विदर्भ केसरी। पांढरकवडा :**

**केळापूरच्या हद्दीबाहेर उडानपुलाचे बांधकाम सुरु असल्यामुळे गावातील शाळकरी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे येथे अंडरपास तयार करण्यात यावा, या मागणीसाठी मंगळवारी चक्क शाळकरी विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरुन आंदोलन केले.**




केळापूर गावाबाहेर उडानपुलाचे काम सुरु असल्याने शाळेत जाण्यासाठी मुलांना थेट राष्ट्रीय महामार्ग ओलांडून जावे लागत आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना दररोज सुमारे २०० मीटर अंतर पायी जावे लागत असून त्यानंतर पुन्हा २०० मीटरचा फेरा मारून शाळेच्या रस्त्यावर पोहोचावे लागत आहे. ही परिस्थिती विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. जड वाहतुकीची सतत वर्दळ असलेल्या या मार्गावरून लहान मुलांना चालत जावे लागणे, सुरक्षित पर्यायी मार्ग नसणे आणि रस्ता ओलांडताना अपघाताचा धोका निर्माण होणे, यामुळे पालकांमध्येही तीव्र चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गावातून फेरा काढत थेट उडानपुलाच्या ठिकाणी जाऊन तीव्र आंदोलन केले. हातात फलक घेऊन आणि घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी आपली व्यथा प्रशासनासमोर मांडली. "आम्हाला अंडरपास (बोगदा) द्या, अन्यथा हा उडानपूल नकोच," अशी एकमुखी मागणी विद्यार्थ्यांनी केली. अंडरपासची सुविधा उपलब्ध झाल्यास शाळकरी मुलांसह ग्रामस्थांची ये-जा सुरक्षित आणि सुलभ होईल, असे आंदोलकांचे म्हणणे आहे. केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी आणि सर्वसामान्य गावकऱ्यांसाठीही अंडरपास अत्यंत आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले. या मागणीसाठी याआधीही केळापूर ग्रामस्थांनी विशेष ग्रामसभा घेऊन उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, आमदार राजू तोडसाम, खासदार प्रतिभा धानोरकर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच महामार्ग प्रकल्पाचे प्रोजेक्ट मॅनेजर अभिजित जिचकर यांना निवेदने सादर केली.

वेळोवेळी प्रत्यक्ष भेटी घेऊन समस्येची जाणीव करून देण्यात आली. तरीही अंडरपासच्या मागणीवर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### अंडरपास नाही तर उडानपूलही नको!

■ **प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून "अंडरपास दिला नाही तर उडानपूल नकोच," या भूमिकेवर ग्रामस्थ ठाम आहेत. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता प्रशासनाने संवेदनशीलतेने दखल घ्यावी आणि त्वरित अंडरपासची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी सर्व स्तरातून होत आहे.**




## श्री दत्त हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटरतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**विदर्भ केसरी। यवतमाळ | प्रतिनिधी**


बोरगाव ग्रामपंचायत येथे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत तपासणी शिबिर रविवार १८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी शिबिराचा १४८रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात डॉ. आशीष लढे, डॉ. मुक्ता भोसले, मुख्य समन्वयक सुधीर देशपांडे, तसेच हॉस्पीटलचे इतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
बुधवार, २१ जानेवारी २०२६ | ४



## शनिवारी राहणार पाणीपुरवठा बंद



अमरावती : अमरावती शहर तसेच बडनेरा उपनगराचा पाणीपुरवठा शनिवारी (ता. २४) बंद राहणार आहे. सिंभोरा हेडवर्क्स येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत १३२ केव्ही व ३३ केव्ही सबस्टेशन येथे देखभाल व दुरुस्तीचे काम नियोजित असल्यामुळे येथील विद्युत पुरवठा व पंपिंग बंद राहणार आहे. त्यामुळे २४ जानेवारीला पूर्ण दिवस अमरावती व बडनेरा शहराचा पाणीपुरवठा बंद टाहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा साठा करून ठेवावा व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन मजीप्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# उमरा सर्कलमध्ये वीजेचा बोजवारा

## दिवसा वीज द्या, अभियंत्यावर कारवाई करा .. अन्यथा आंदोलन — शेतकऱ्यांचा इशारा



**▸विदर्भ केसरी। अकोला प्रतिनिधी पूर्णाजी खोडके**

अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील उमरा सर्कलमधील शेतकरी व नागरिक महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे प्रचंड त्रस्त झाले असून, शेतातील वीज रात्री देणे, गावांमध्ये सतत होणारी वीज खंडितता आणि अधिकाऱ्यांची अर्वाच्य व धमकीची भाषा याविरोधात संताप उफाळून आला आहे. या पार्श्वभूमीवर उमरा सर्कलमधील शेतकरी व नागरिकांनी कार्यकारी अभियंता, महावितरण अकोट यांना आक्रमक निवेदन देत तात्काळ कार्यवाहीची मागणी केली आहे.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, उमरा सर्कलमधील शेतातील वीज दिवसा देण्यात यावी, कारण रात्री शेतात पाणी देण्यासाठी जाताना शेतकऱ्यांचा जीव धोक्यात येत आहे. परिसरात वन्य प्राण्यांचे हल्ले वारंवार होत असून, अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना रात्री शेतात जाण्यास भाग पाडणे म्हणजे त्यांच्या जीवाशी खेळ करण्यासारखे आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यासोबतच गावांमध्ये वीज वारंवार खंडित होत असल्याने नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व शेतकरी मोठ्या प्रमाणावर त्रस्त झाले आहेत. या संदर्भात संबंधित अभियंत्यांना विचारणा केली असता, शेतकऱ्यांशी अर्वाच्य, अपमानास्पद व धमकीच्या भाषेत वागणूक दिली जाते, असा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. “वरिष्ठांकडे तक्रार केली तरी मला काही फरक पडत नाही,” अशा प्रकारची विधाने करणे म्हणजे लोकशाही व्यवस्थेची थेट पायमल्ली असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे..

सध्या उमरा महावितरण कार्यालय व संबंधित अभियंता सतत वादग्रस्त ठरत असून, यामुळे उमरा सर्कलमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे... या अभियंत्याला कोणाचा आश्रय आहे का?असा थेट सवाल उपस्थित करण्यात येत आहे..

### शेतकऱ्यांच्या मागण्या

- **उमरा सर्कलमधील शेतातील वीज दिवसा देण्यात यावी गावातील सतत होणारी वीज खंडितता तात्काळ थांबवावी शेतकऱ्यांशी अर्वाच्य भाषेत वागणाऱ्या संबंधित अभियंत्याची तात्काळ बदली करावी**

### शेतकरी व नागरिकांना न्याय द्यावा

- **या मागण्यांकडे तात्काळ लक्ष दिले नाही, तर महावितरण कंपनीविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच भविष्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात कोणत्याही शेतकऱ्याच्या जीवितास हानी झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकारी व महावितरण कंपनीची राहील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे....**
- **या निवेदनाची प्रत आमदार प्रकाश भाऊ भारसाकळे यांनाही देण्यात आली आहे. यावेळी सुभाष सुरतने, ऋषिकेश लोणकर, किशोर बोंद्रे, निशांत मंगळे, मुरलीधर पाडोळे, भागवत मंगळे, विजय भारसाकडे, नितीन सुरतने, ज्ञानेश्वर राऊत, संजय महाले, संजू भाऊ शेंद्रे, अंबादास सुरतने, मोहन लबडे, विनायक सुरतने, सिद्धार्थ लबडे, आशिष महाले, सोपान सोनोने, प्रथमेश आगलावे, प्रदीप पालवे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते**

### महत्त्वाचे



## जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव अमरावती येथे निबंध व चित्रकला स्पर्धा सुरू

**▸विदर्भ केसरी। अमरावती -**

चाचा नेहरू बाल महोत्सव अमरावती येथे सुरू असून त्यामधील सहभागी झालेल्या जिल्ह्यातील विविध बालगृहातील 40 विद्यार्थ्यांनी चित्रकला व निबंध स्पर्धेमध्ये घेतला. असून सहभागीवयोगट सहा ते बारा मध्ये चित्रकला स्पर्धेचे विषय माझे स्वप्नातील घर, स्वच्छ भारत सुंदर भारत, परिकथा कार्टून होते.वयोगट 12 ते 18 मध्ये विषय पावसाळ्यातील दृश्य, प्रदूषण मुक्त शहर, बालविवाह मुक्त जनजागृती हे विषय होते. सदर स्पर्धेचे सूत्रसंचालन नारायण गाडगे समुपदेशक यांनी केले. या स्पर्धेवेळी सुशील डोंगरदिवे परीविक्षाअधिकारी, मेघा महात्मे जिल्हा परीक्षा अधिकारी, वैशाली चौरे परिविक्षा अधिकारी, रमेश खारोडे वरिष्ठ लिपिक, कीर्ती सगणे सामाजिक कार्यकर्ता, मीरा राजगुरे समुपदेशक, ऋषभ मुंडे सुपरवायझर, सर्वोदय जेवने सुपरवायझर इत्यादी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे कर्मचारी जिल्हा बालकल्याण अधिकारी श्री भडांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित होते.

## गौणखनिजाच्या वादातून वाहनाने चिरडून हत्या

**▸विदर्भ केसरी। चांदूरबाजार**

गौणखनिजाच्या वादातून एका व्यावसायिकाची वाहनाने चिरडून हत्या करण्यात आल्याचा आरोप पोलिसांत दाखल तक्रारीतून करण्यात आल्याने हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाने चांदूरबाजारात चांगलीच खळबळ उडाली आहे. चांदूरबाजार ते वलगाव रोडवरील शाळेजवळ पादचारी दाम्पत्यास एका वाहनाने धडक दिली. त्यात वाहनाने चिरडून व्यावसायिकाची हत्या करण्यात आली, असा आरोप मृत व्यक्तीच्या नातेवाइकांनी केला. या घटनेनंतर संतप्त जमावाने चांदूरबाजार ठाण्यावर धडक दिली होती. नीलेश सुरेश बदुकले (वय ४२), असे हत्या झालेल्या व्यावसायिकाचे नाव असल्याची माहिती चांदूरबाजारचे ठाणेदार अशोक जाधव यांनी दिली. सोमवारी (ता. १९) सकाळी सहाच्या सुमारास ही घटना घडली. नीलेश बदुकले पत्नीसह मॉर्निंग वॉकला जात असताना संशयित अजय लंगोटे चालवित असलेल्या एमएच २७ बीएक्स ०४२१ क्रमांकाच्या वाहनाने श्री. बदुकले यांना धडक दिली. यात नीलेश बदुकले यांचा मृत्यू झाला असून पत्नी गंभीर आहे. मृत व्यावसायिकाचे वडील सुरेश भीमराव बदुकले (वय ७१) यांनी याप्रकरणात पोलिसांत तक्रार दिली. त्यात वाहन चालक अजय भुजंगराव लंगोटे (रा. थुगाव पिंपरी) याच्याशी नीलेश बदुकले यांचा गौण खनिजाच्या व्यवसायावरून पूर्वी वाद होता. याच वादातून जाणीवपूर्वक वाहनाने धडक देऊन चिरडून हत्या करण्यात आल्याचा आरोप ठाण्यावर धडकलेल्या नागरिकांनी केला. चांदूरबाजार पोलिसांनी अजय भुजंगराव लंगोटे याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

# राष्ट्रीय युवा सप्ताह व खाशाबा जाधव जयंती उत्साहात

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत 'मेरा युवा भारत केंद्र', अकोला आणि नेहरू युवा बहुउद्देशीय क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कोकणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने मुर्तिजापुर शहरात राष्ट्रीय युवा सप्ताह आणि ऑलिंपिकवीर स्व. खाशाबा दादासाहेब जाधव यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन 'मेरा युवा भारत'चे तालुका समन्वयक विलास वानखडे यांनी केले. यावेळी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा प्रसार करणारी पत्रके वाटून युवकांना सन्मानित करण्यात आले. स्वामी विवेकानंदांच्या विचारांची आज गरज कार्यक्रमादरम्यान विलास वानखडे यांनी आजच्या तरुणांसमोर असलेल्या आव्हानांवर भाष्य केले. ते म्हणाले की, "आजचा युवक मोबाईलचे व्यसन, नैराश्य (डिप्रेशन) आणि चुकीच्या मार्गांकडे वळत आहे. अशा काळात स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील सामर्थ्यशाली युवक घडवण्यासाठी त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे. युवकांनी स्वामीजींचे गुण अंगीकारून स्वतःचा आणि देशाचा विकास करावा, हाच या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे." खाशाबा जाधवांच्या ऐतिहासिक कामगिरीचे स्मरण यावेळी स्वतंत्र भारताला पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक मिळवून देणारे कुस्तीगीर स्व. खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. जन्म: १५ जानेवारी १९२५ गोळेश्वर, जि. सातारा १९५२ च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये कुस्तीत ऐतिहासिक कांस्य पदक पटकावले. त्यांच्या या योगदानामुळे त्यांचा जन्मदिन 'राज्य क्रीडा दिन' म्हणून साजरा केला जावा आणि क्रीडाप्रेमींनी त्यांचे कार्य प्रेरणा म्हणून घ्यावे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. युवा व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव कार्यक्रमाच्या सांगता समारंभात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये प्रामुख्याने: ज्ञानेश टाले क्रीडा शिक्षक विनोद काळबांडे तालुका क्रीडा कार्यालय मुन्ना श्रीवास सर्पमित्र मंगेश तेलमोरे मेजर फिटनेस ॲकडमी रवी गोंडकर जी.के. ॲकडमी मंगेश घुगे फौजी फिटनेस ॲकडमी दिनेश श्रीवास सिटी टायकोंडो गजानन चव्हाण व अक्षय वानखडे सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह अनेक युवक-युवतींना सन्मानित करून या युवा सप्ताहाची सांगता करण्यात आली. या उपक्रमामुळे शहरातील युवक वर्गात आनंद झाला

# सोलर पॅनलच्या नावाने साडेदहा लाखांनी फसवणूक

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

घरोघरी सौरउर्जेचे पॅनल बसविण्याचे काम करणाऱ्या कंपनीच्या संचालकाने आठ पोलिसांसह इतर नागरिकांकडून साडे दहा लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. त्यामुळे संतप्त गुंतवणूकदारांनी फसवणूक करणाऱ्याला त्याच्या रहाटगाव मार्गावरील कार्यालयासमोर गाठून बेदम मारहाण केल्याची घटना शहरात घडली. अभिजित सुरेंद्र धर्माळे (वय ४०, रा. जिजाऊनगर, कठोरा रोड), असे फसवणुकीचा गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव असल्याची माहिती गाडगेनगरचे पोलिस निरीक्षक अतुल वर यांनी दिली. विजय लीलाराम कासयानी (रा. मूर्तिजापूर, जि. अकोला) यांनी गाडगेनगर ठाण्यात सोमवारी (ता. १९) तक्रार दाखल केली. त्या आधारे अभिजित धर्माळे विरुद्ध गुन्ह्याची नोंद झाली. गाडगेनगर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. काही महिन्यांपूर्वी अभिजित धर्माळे यांनी एका कंपनीची स्थापना केली. स्वतः अभिजितसह एक महिला नातेवाईक त्या कंपनीचे संचालक आहेत. त्या कंपनीचे कार्यालय रहाटगाव मार्गावर स्थापन केले असून, कंपनीद्वारे सोलर पॅनल बसवून देऊन ते कार्यान्वित करण्याचे आश्वासन धर्माळे व त्याच्या सहकारी महिलेने दिले होते. त्यासाठी नागरिकांना भेटून सोलर पॅनलची माहिती दिल्या जात होती. नागरिकांनी सौरऊर्जेवर वीजनिर्मितीचा प्रकल्प घरोघरी बसविण्यासाठी अभिजित धर्माळे यांच्यासोबत संपर्क साधला होता. अभिजित याने खासगी व्यक्ती व पोलिस कर्मचाऱ्यांकडून पॅनल बसविण्याच्या नावाने अग्रीम राशी घेतली. काही जणांच्या इमारतीवर खांब बसवून उर्वरित काम अर्धवट सोडले.

# परतवाडा–अंजनगाव महामार्गावरील अपघातांबाबत आमदारांनी घेतली आढावा बैठक

**▸विदर्भ केसरी।परतवाडा**

परतवाडा ते अंजनगाव राष्ट्रीय महामार्गावर अलीकडच्या काळात अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर अपघात रोखण्यासाठी व रस्ते सुरक्षेसंदर्भात ठोस उपाययोजना राबविण्याच्या उद्देशाने आज सर्किट हाऊस, परतवाडा येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले.



या बैठकीला आमदार मा. केवलराम काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता वानखडे साहेब, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे उपविभागीय अधिकारी वानखडे साहेब, ढेपे साहेब, परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार म्हस्के साहेब, साहेबरावजी काठोळे, सुधीर रसे, तुषार खेरडे, हिरूजी गायन यांच्यासह महामार्गालगत असलेल्या गावांचे सर्व सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. रस्त्यावर आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविणे, अपुरी असलेली प्रकाश व्यवस्था (स्ट्रीट लाईट) तातडीने सुरू करणे, दिशादर्शक व सूचनाफलक लावणे, तसेच वेगमर्यादा व वाहतूक नियंत्रणाबाबत प्रभावी उपाययोजना करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महामार्गालगत राहणाऱ्या नागरिकांनी आपल्या समस्या मांडत अपघात रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून लवकरात लवकर आवश्यक सुधारणा करण्याचे आश्वासन दिले.

- **“परतवाडा ते अंजनगाव महामार्गावर होणारे अपघात ही गंभीर बाब असून नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत. याबाबत कोणतीही दिरंगाई न करता अपघातप्रवण ठिकाणी तातडीने स्पीड ब्रेकर, प्रकाश व्यवस्था आणि दिशादर्शक फलक बसविण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील व अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी केले जाईल,” असे आमदार केवलराम काळे यांनी यावेळी स्पष्ट केले.**

# छोरिया नगरला नगरसेवक अविनाश ब्राम्हणवाडे यांची भेट

## सौर पथदिवे चोरीप्रकरणी प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर**

नगर पंचायत हद्दीतील छोरिया नगर 2 व छोरिया लेआऊट परिसरात राष्ट्रवादी कॉंग्रेस चे नगरसेवक श्री. अविनाश ब्राम्हणवाडे व विरोधी गट नेते भारतीय जनता पार्टी चे नगरसेवक संजय जी पोफळे राष्ट्रवादी नेते राहुल गेडाम यांनी नुकतीच भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी परिसरातील प्रलंबित समस्या जाणून घेतल्या. यामध्ये सौर ऊर्जेवर चालणाऱ्या पथदिव्यांच्या चोरीचा गंभीर मुद्दा नागरिकांनी त्यांच्यासमोर मांडला. छोरिया नगर 2 मध्ये राहणारे श्री. राजू ढोके व दाणी बापू यांच्या घरासमोर बसविण्यात आलेले तीन सौर पथदिवे दिनांक 27 डिसेंबर 2022 रोजी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. या चोरीत सोलर पॅनल, लिथियम बॅटरी व लाईटचा समावेश आहे. हे पथदिवे नगर पंचायतमार्फत सार्वजनिक प्रकाशव्यवस्थेसाठी बसविण्यात आले होते. या घटनेबाबत परिसरातील नागरिकांनी तात्काळ नगर पंचायत प्रशासन व पोलिसांना माहिती दिली होती. मात्र इतका मोठा कालावधी लोटूनही अद्याप पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही, ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नगरसेवक अविनाश ब्राम्हणवाडे व संजय पोपळे राष्ट्रवादी नेते राहुल भाऊ गेडाम यांनी घटनास्थळी पाहणी करत प्रशासनाच्या दुर्लक्षावर नाराजी व्यक्त केली. “सार्वजनिक मालमत्तेची चोरी होऊनही जर तक्रार दाखल होत नसेल, तर ही गंभीर बाब आहे. याचा अर्थ गावातील सार्वजनिक मालमत्ता व नागरिकांच्या सुरक्षेबाबत संबंधित मुख्याधिकाऱ्यांना काही देणेघेणे नाही, अशी भावना निर्माण होत आहे,” अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.



- **या प्रकरणी तात्काळ पोलीस तक्रार दाखल करून दोषींवर कारवाई करावी, तसेच भविष्यात सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिक व स्थानिक प्रतिनिधींनी केली आहे. उपस्थित - विजय सोनोने शुभम ब्राम्हणवाडे, विक्की भगत, अभिषेक पवार,**

# गजानन चव्हाण यांना 'छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार' प्रदान

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

सामाजिक सलोखा, रक्तदान आणि पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने झटणारे सालतवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते आणि होमगार्ड गजानन सखाराम चव्हाण यांना 'छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.
वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्ट, कारंजा (लाड) यांच्या वतीने आयोजित द्वितीय राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा बहुमान देण्यात आला.



दिमाखदार सोहळ्यात गौरव
१८ जानेवारी २०२६ रोजी कारंजा येथे पार पडलेल्या या सोहळ्यात कारंजा-मानोरा विधानसभा क्षेत्राच्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या शुभहस्ते श्री. चव्हाण यांना शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र आणि पुरस्कार तालिका देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्यांच्या सोबत त्यांची पत्नी आणि मुलेदेखील उपस्थित होती.

**लोकसेवेचा आदर्श प्रवास**

गजानन चव्हाण हे होमगार्ड संघटनेत कार्यरत असून त्यांनी आपल्या कर्तव्यासोबतच समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव नेहमीच जपली आहे. त्यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत: **सामाजिक सलोखा:** समाजात एकता आणि शांतता टिकवण्यासाठी विविध उपक्रमांत पुढाकार.यापूर्वी त्यांना ५ राज्यस्तरीय आणि ३ राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव एकनाथ पवार यांनी त्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर गजानन चव्हाण भावूक झाले. त्यांनी हा सन्मान आपल्या दिवंगत आई-वडिलांना स्व. मंजुळाबाई व सखारामजी चव्हाण, दिवंगत मोठी बहीण व जावई, तसेच त्यांचे पालनकर्ते मिराताई व ईश्वरबाप्पू दांडगे, जिजाताई व गोपालबाप्पू खंडारे आणि संपूर्ण चव्हाण परिवाराला समर्पित केला आहे. या सोहळ्याला ज्योतिषाचार्य सागर देशमुख महाराज, डॉ. पंकज काटोले, पुंडलीक गोसावी, दिलीप टीकडे, विजय तेलगोटे, ओंकार मालवळकर, शारदाताई भुयार, आशाताई मेश्राम यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### परिसरात आनंदाचे वातावरण

- **या यशामुळे सालतवाडा गावकरी, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, मूर्तिजापूर होमगार्ड पथकातील सहकारी, पोलीस कर्मचारी आणि स्वच्छता अभियान व श्रीराम प्रॉपर्टीच्या सदस्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

# वाघ आणि कोळशाच्या जिल्ह्यात बेरोजगारीचा 'भडका'

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**

एकीकडे चंद्रपूर जिल्ह्यातील चिमण्यांमधून धूर निघतोय आणि गडचिरोलीच्या जंगलात वनसंपत्ती ओसंडून वाहत आहे, मात्र दुसरीकडे याच मातीतील तरुणांच्या हाताला काम नसल्याने ते 'अंधारातील धंद्यांकडे' वळत आहेत. रोजगाराच्या नावावर केवळ आश्वासने मिळत असल्याने वैफल्यग्रस्त तरुण आता कोळसा तस्करी, अवैध रेती उपसा आणि दारूच्या तस्करीमध्ये आपला जम बसवत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.



स्थानिक कंपन्यांची 'दुजाभाव' नीती तरुणांच्या मुळावर आल्याने चंद्रपूर जिल्ह्यात वेकोलि (WCL), सिमेंट कंपन्या आणि थर्मल पावर स्टेशनचे जाळे आहे. मात्र, या कंपन्यांमध्ये स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप स्थानिक तरुण करत आहेत. "आमची जमीन गेली, प्रदूषण आम्ही सोसतो, पण नोकरी मात्र बाहेरच्यांना?" हा संतप्त सवाल आता गुन्हेगारीच्या रूपाने बाहेर पडत आहे.

गडचिरोली जिल्ह्यात अधिकृत दारूबंदी असली, तरी बेरोजगार तरुणांसाठी ही 'बंदी' कमाईची संधी ठरत आहे. चंद्रपूर किंवा गोंदिया सीमेवरून दुचाकीने दारूच्या बाटल्यांची वाहतूक करण्यासाठी तरुणांना दिवसाला ५०० ते १००० रुपये दिले जातात. हे तरुण केवळ 'डिलिव्हरी बॉय' म्हणून गुन्हेगारी विश्वात पाऊल ठेवतात आणि नंतर मोठ्या गुन्ह्यांत अडकतात. रेती माफियांचा हैदोस: वर्धा आणि पैनगंगा नदीच्या पात्रातून होणाऱ्या अवैध रेती उपशात तरुण मजुराचा मोठ्या प्रमाणावर वापर

- **सुरक्षित गुन्हेगार-:**

आयटीआय आणि पदवी पूर्ण केलेले तरुण आता सध्या मजुरीसाठी वन वन भटकत असून शेवटी कृपया छुप्या धंद्यामध्ये सामील होत आहेत

सोशल मीडियाचा प्रभाव -: इंस्टाग्राम आणि फेसबुक वरील भाईगिरी ला भुलून तरुण अवध्य शस्त्र भागण्याकडे आकर्षक होत आहेत

पालकांमध्ये चिंतेचे वातावरण मुलांनी शिकावे आणि मोठे अधिकारी व्हावे या आशेने शेतकरी आपले शेती विकून शिक्षण पूर्ण करणाऱ्या पालकाचे डोळे आता पाणवले आहेत मुलगा शिकला पण नोकरी नाही आता तो चुकीच्या लोकांसोबत फिरतोय अशी व्यथा एका हताश पित्याने व्यक्त केली आहे

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## एटापल्ली येथे भाजपा पक्षाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन



एटापल्ली : एटापल्ली येथे भारतीय जनता पक्षाच्या नवीन जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव महाराज यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. नव्या कार्यालयामुळे संघटनाची ताकद अधिक वाढून जनसेवेची गती आणखी वेगवान होणार आहे. यावेळी युवानेते कुमार अवधेशराव बाबा आत्राम, नगरपंचायतचे भाजपाचे नगराध्यक्षा रेखा मोहूर्ले, भाजपचे तालुका अध्यक्ष प्रसाद पुल्लूरवार, प्रशांत आत्राम उपसरपंच तोडसा ग्रामपंचायत, मोहन नामेवार,राकेश हिरा, तिरुपती चापले,आविष्कार गड्डमवार, सुरेखाताई अडगोपुलवार, निर्मलाताई कोडबतुनवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षीप्त



### मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची ऐतिहासिक मार्कंडा मंदिरास भेटविकासकामांची पाहणी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज चामोर्शी तालुक्यातील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या मार्कंडा मंदिरास भेट देऊन तेथे सुरू असलेल्या जिर्णोद्धार तसेच विविध विकासकामांची पाहणी केली. मंदिराच्या ऐतिहासिक वारशाला साजेशा पद्धतीने, दर्जेदार व कालबद्ध रीतीने ही कामे पूर्ण व्हावीत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी संबंधित यंत्रणांना दिल्या. मुख्य सचिवांनी मंदिराच्या जिर्णोद्धारासह परिसरातील घाट, वाहनतळ, उद्यान (बगीचा), स्वच्छतागृह तसेच अंतर्गत व बाह्य सौंदर्यीकरणाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. या कामांदरम्यान येणाऱ्या अडचणी, तांत्रिक बाबी तसेच पुढील टप्प्यातील नियोजन याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली आणि आवश्यक त्या सूचना दिल्या. या पाहणी दौऱ्यावेळी विभागीय आयुक्त तथा प्रधान सचिव विजयालक्ष्मी बिदरी, पुरातत्त्व विभागाच्या महासंचालक नंदिनी साहू, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, पुरातत्त्व अधिक्षण अरूण मलिक, तसेच सहायक जिल्हाधिकारी एम. अरूण प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळचे अधीक्षक अभियंता समय निकोसे यांनी सादरीकरणाद्वारे मंदिराच्या बाह्य परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची सविस्तर माहिती दिली. मंदिर परिसरातील सौंदर्यीकरणाचे सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले असून, रस्ता, वाहनतळ व स्वच्छतागृहांची कामे सध्या प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दुसऱ्या टप्प्यात नदीघाटाचे प्रवेशद्वार तसेच इतर पूरक विकासकामे हाती घेण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

पुरातत्त्व विभागाच्या महासंचालक नंदिनी साहू यांनी मंदिराच्या दुरुस्ती व जतन विषयक कामांची माहिती दिली, तर अभ्यासक शिवाली शर्मा यांनी मार्कंडा मंदिराच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व वास्तुशास्त्रीय महत्त्वाबाबत सविस्तर माहिती दिली.

# जिल्ह्याच्या गरजा ओळखून पाच वर्षांचा मास्टर प्लॅन तयार करा


## सहपालकमंत्री ॲड.आशिष जयस्वाल : २०२६-२७ साठी ३७१ कोटींचा प्रारूप आराखडा मंजूर

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : जिल्ह्यातील सर्व विभागांनी केवळ लोकसंख्येच्या आधारावर नव्हे, तर जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार, दुर्गमता, दळणवळणाची परिस्थिती आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन पुढील पाच वर्षांचा समन्वित मास्टर प्लॅन तयार करावा, अशा स्पष्ट सूचना राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिल्या. जिल्ह्याच्या एकूण विकासासाठी किती निधी आवश्यक आहे याचा वास्तववादी अंदाज घेऊन तो पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने विभागावा आणि त्यानुसार पुढील पाच वर्षांसाठीची मागणी शासनाकडे सादर करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. सन २०२६-२७ साठी जिल्हा वार्षिक योजना ( सर्वसाधारण) अंतर्गत २९६ कोटी ७८ लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला होता. यासोबतच आकांक्षित जिल्हा म्हणून ७४ कोटी १९ लाख रुपये अतिरिक्त प्रस्तावित करण्यात आल्याने एकूण सुमारे ३७१ कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा या बैठकीत मंजूर करण्यात आला. मात्र, विविध अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून एकूण ६६८ कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी नोंदविण्यात आली आहे, त्यामुळे अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्यास राज्य स्तरीय बैठकीत भक्कम व परिणामकारक कारणमिमांसा स्पष्ट करून जिल्ह्याची बाजू प्रभावीपणे मांडावी, असेही त्यांनी सांगितले. सन २०२६-२७ साठीचा प्रारूप आराखडा मंजूर करणे तसेच चालू आर्थिक वर्षातील जिल्हा विकास निधीतील खर्चाचा आढावा सहपालकमंत्री ॲड. जयस्वाल यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतला. यावेळी जिल्ह्याचे पालक सचिव तथा वनविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, खासदार नामदेव किरसान, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आमदार रामदास मसराम, आमदार अभिजित वंजारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी एम. अरुण, नियोजन उपायुक्त अनिल गोतमारे, जिल्हा नियोजन अधिकारी प्रसाद घाडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष व दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. गडचिरोली हा विस्तीर्ण आणि अवघड भौगोलिक रचना असलेला जिल्हा असल्याने विकास निधीची मागणी करताना क्षेत्रफळ, दुर्गमता, दळणवळण सुविधा, मूलभूत सोयी- सुविधा आणि आदिवासी भागांच्या विशेष गरजा लक्षात घेण्याचे निर्देश सहपालकमंत्र्यांनी दिले. मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी वनविभागाने समन्वित नियोजन करावे, वन्यप्राणी शेतीकडे येणार नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, तसेच वनक्षेत्रालगतच्या गावांतील नागरिकांना सरपणासाठी जंगलात जाण्याची गरज भासू नये यासाठी प्राधान्याने गॅस कनेक्शन उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी नमूद केले. आरोग्य सेवा अधिक सुदृढ करण्यासाठी आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या सहकार्याने आरोग्य विभागाने नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच ग्रामीण रस्ते उभारणीसाठी शासनाकडून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न वाढवावेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी खासदार नामदेव किरसान तसेच आमदार डॉ. नरोटे, आमदार रामदास मसराम आणि आमदार अभिजित वंजारी यांनी विविध विकासकामांबाबत प्रश्न व सूचना मांडल्या. निधी पुनर्विलोकनाच्या वेळी विधानसभा मतदारसंघनिहाय निधी वितरणावर सविस्तर चर्चा केली जाईल, असे सहपालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. चालू आर्थिक वर्षात मंजूर झालेला निधी मार्च २०२६ पूर्वी पूर्णपणे खर्ची पडेल, याचे काटेकोर नियोजन सर्व यंत्रणांनी करावे; विहित मुदतीत निधी खर्च न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणेची राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी सादरीकरणाद्वारे जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्याची सविस्तर माहिती दिली. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) सन २०२६-२७ साठी राज्य शासनाने निर्धारित केलेल्या आर्थिक मर्यादेत, अतिरिक्त मागण्यांसह प्रारूप आराखडा तयार करण्यात आला असून प्रत्येक विभागाने आपल्या मागण्या योग्यरीत्या नोंद झाल्याची खात्री करून घ्यावी, असे त्यांनी सांगितले. तसेच सन २०२५-२६ साठी अद्याप प्रशासकीय मान्यता न मिळालेल्या कामांची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी आणि ज्या ठिकाणी निधी विहित वेळेत खर्च होणार नाही, तेथे बचतीची माहिती जिल्हा नियोजन समिती कार्यालयास कळवून पुनर्विनियोजनाची प्रक्रिया सुलभ करावी, असेही त्यांनी सूचित केले. बैठकीच्या शेवटी जिल्हा नियोजन अधिकारी प्रसाद घाडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सहाय्यक नियोजन अधिकारी हटवार व पेरगु यांनी बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.







### नव्या सेनापतींच्या स्वागतासाठी प्रशासन झाले सज्ज

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अमरावती : नगरपालिका नगरपंचायती आणि महापालिकेची निवडणूक आटोपल्यामुळे येत्या काळात जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक होणार आहे. त्यासाठीची प्रशासकीय तयारी सुरु झाली असून पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांसाठी ५० लाख तर मुख्यालयातील दालनांसाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मार्च २०२२ मध्ये तत्कालीन पदाधिकारी आणि सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये प्रशासक राजवट सुरु आहे. परंतु येत्या काळात आधी सदस्यांची आणि पुढे त्यातूनच पदाधिकाऱ्यांची निवड होणार असल्याने जिल्हा परिषद प्रशासनाने पदाधिकाऱ्यांचे सरकारी बंगले व मुख्यालयातील कार्यालयांच्या डागडूजीचे काम हाती घेतले आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाच्या मते निवडणुका केव्हा होतील, हे अनिश्चित असल्यामुळे पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि दालनांच्या डागडूजीसाठीची दरवर्षीची तरतूद ही गेल्या तीन वर्षांपासून पुढे-पुढे सरकत आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद कर्मचारी वसाहतीच्या परिसरात बांधण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांचे आणि मुख्यालयातील त्यांच्या दालनांचे दुरुस्तीकार्य सुरु करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेत अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती असे एकूण सहा पदाधिकारी आहेत. अध्यक्ष हे आमसभेचे अध्यक्ष असण्यासोबतच स्थायी समिती व जल व्यवस्थापन समितीचेही पदसिद्ध सभापती असतात, तर दुसरीकडे उपाध्यक्षांकडे दोन समित्यांच्या सभापतीपदाचे कामकाज सोपविले जाते. याशिवाय महिला व बालविकास आणि समाजकल्याण समितीला दोन स्वतंत्र सभापती असतात. तर अन्य दोन सभापतींकडे शिक्षण, आरोग्य, वित्त व बांधकाम यापैकी प्रत्येकी दोन-दोन खाती दिली जातात. या सर्वांच्या निवासस्थानांची आणि कार्यालयांची सोय शाससनातर्फे करण्यात आली आहे. त्यामुळे त्या इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारीदेखील शासनातर्फेच दरवेळीच केली जाते. हे अनिश्चित असल्यामुळे पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि दालनांच्या डागडूजीसाठीची दरवर्षीची तरतूद ही गेल्या तीन वर्षांपासून पुढे-पुढे सरकत आली आहे. जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना वेळोवेळी जिल्हाभर प्रवास करावा लागतो. त्यासाठी त्यांना सरकारी किंवा खासगी वाहन वापरता येते. खाजगी वाहन वापरल्यास जिल्हा परिषद प्रशासनातर्फे वेगळा इंधन भत्ता दिला जातो. मात्र तो पुरेसा नसल्यामुळे सर्व पदाधिकारी सरकारी वाहनांचीच मागणी करतात, असा अनुभव आहे. त्यामुळे या वाहनांसाठी लागणारे इंधन आणि चालकाची सोयदेखील प्रशासनातर्फेच केली.

## महिला नगरसेवकाचे नातेवाईक अधिकृत कागदपत्रांवर सह्या करू शकत नाहीत : नगरसेविका प्रांजली गुल्हाने

### महिला नगरसेविकेच्या नातेवाईकांनी सह्या केल्यास होणार कारवाई

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : अमोल धवसे**

नांदगाव खंडेश्वर - ( तालुका प्रतिनिध ) महिला नगरसेविकेच्या अधिकारांचे संरक्षण आणि पती/नातेवाईकांकडून होणाऱ्या अधिकारांच्या वापरास/सही करण्यावर आक्षेप घेणे बाबत.नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतचे प्रभाग क्रमांक १४ या प्रभागातुन निवडून आलेल्या नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने यांनी मुख्याधिकारी यांना पत्र व्यवहार करुन सदर मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत सविस्तर असे की, माहिती नुसार आजच्या काळात , काही प्रकरणांमध्ये किंवा कामकाजामध्ये जनतेने निवडुन दिलेल्या महिला नगरसेविकांच्या अनुपस्थितीत अथवा माहितीशिवाय पती नगरसेविका पदाचा किवा त्यांते अधिकारांचा वापर करत असल्यास किंवा त्यांच्या वतीने कागदपत्रांवर सह्या करत असल्याचे. आढळल्यास याबाबत माहिती अशी की, भारतीय संविधानानुसार आणि संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार, निवडून आलेली लोकप्रतिनिधी म्हणून सर्व अधिकार आणि जबाबदाऱ्या केवळ निवडुण आलेल्या लोक नियुक्त महिला नगरसेविकांच्या कडेच असतात,पत्नीच्या वतीने सही करण्याचा किंवा कोणताही



अधिकृत निर्णय घेण्याचा अधिकार पतीला किंवा इतर कोणत्याही नातेवाईकाला नाही. त्यामुळे, भविष्यात कोणत्याही शासकीय पत्रावर, बैठकीच्या इतिवृत्तावर किंवा इतर कोणत्याही अधिकृत कागदपत्रावर महिला नगरसेविंकाच्या व्यतिरिक्त इतर कोणाचीही सही स्वीकारली जाऊ नये.नगरसेविकांच्या अधिकारांचा गैरवापर थांबवण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात येणारे संबंधित विभागांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात. ही बाब अत्यंत गंभीर असून, महिला लोकप्रतिनिधी म्हणून नगरसेवक हे शासकीय अधिकारी (Gazetted Officer) नसतात: नगरसेवक हे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात, शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांना कागदपत्रे attest (साक्षांकित) करण्याचा अधिकार नसतो. अधिकार वैयक्तिक असतो: सही करण्याचा किंवा attest करण्याचा अधिकार हा संबंधित व्यक्तीला (मग तो शासकीय अधिकारी असो किंवा नगरसेवक) त्याच्या पदाच्या आणि कायद्याने दिलेल्या मर्यादेत असतो. हा अधिकार नातेवाईकाकडे हस्तांतरित करता येत नाही. कायदेशीर तरतूद: कोणत्याही अधिकृत शासकीय किंवा निम-शासकीय कामासाठी, केवळ कायद्याने अधिकृत व्यक्तीच सही किंवा शिक्का वापरू शकते. नातेवाईकाने केलेली सही कायदेशीररित्या वैध मानली जाणार नाही आणि अशा कृतीमुळे कायदेशीर कारवाई होऊ शकते. नगरसेवकाच्या अनुपस्थितीत त्यांच्या घरातील सदस्याने (नातेवाईकाने) कागदपत्रांवर सही करणे हे बेकायदेशीर आहे आणि ते कायद्याने मान्य केले जात नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून, महिला लोकप्रतिनिधी म्हणून माझ्यासह सर्वांचे कायदेशीर अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याची मागणी एका लेखी निवेदनाव्दारे नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने यांच्या कडुन करण्यात आली आहे

## अखेर महामार्गावर गतिरोधकाचे काम सुरू

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मारेगाव : शहरातील तहसील कार्यालयासमोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, मार्डी चौक, राष्ट्रीय विद्यालयाजवळ महामार्गावर गतिरोधक (ब्रेकर) उभारण्यात यावेत, अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षासह इतर संघटनांनी निवेदनाद्वारे केली होती. काही दिवसांपूर्वी तहसील कार्यालयाजवळ गतिरोधक तयार करण्यात आले होते. मात्र उर्वरित ठिकाणीही गतिरोधक बसवण्यात यावेत, यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुन्हा पाठपुरावा करत निवेदन दिले. या निवेदनाची दखल घेत आज सोमवार, दि. १९ जानेवारीला राष्ट्रीय विद्यालयाजवळ गतिरोधकाचे काम सुरू करण्यात आले आहे. करंजी-घुग्गुस हा महामार्ग मारेगाव शहरातून जात आहे. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. शाळा, महाविद्यालये असून दर मंगळवारी बाजार भरतो. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला होता. याबाबत काँग्रेस पक्ष व युवक काँग्रेसच्या वतीने सातत्याने मागणी लावून धरली होती. निवेदनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित कार्यवाही करत आज काम सुरू केले आहे. या वेळी तालुकाध्यक्ष वसंतराव आसुटकर, माजी जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती अरुणा खंडाळकर, समीर सय्यद, रविंद्र धानोरकर, नंदेश्वर आसुटकर, अंकुश माफुर, युवक काँग्रेस अध्यक्ष आकाश बदकी, तुळशीराम पेंदोर, अरविंद वखनोर, छाया किणाके, दुष्यंत जयस्वाल, हेमंत नांराजे, अजाबराव गजभिये, माया गाडगे, बबलू कुरेशी, मंगेश उईके, गितेश तामगाडगे, धिरज डांगाले, मनोज भोपरे, गणू पाटील, थेरे, रोशन मोते, भावराव मेश्राम यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## क्षत्रिय राजपूत समाज मंडळ येंगाडा येथे महाराणा प्रताप स्मारक अनावरण सोहळा

### सामाजिक कार्यकर्ते दिनेश सिडाम तथा माजी सरपंच यांची उपस्थिती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : आरमोरी तालुक्यातील क्षत्रिय राजपूत समाज मंडळ, येंगाडा यांच्या वतीने महान योद्धा महाराणा प्रतापजीका स्मारक अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून आमदार श्री. रामदासजी मसराम विधानसभा क्षेत्र आरमोरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराणा प्रतापजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून स्मारकाचे विधिवत अनावरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार रामदास मसराम यांनी महाराणा प्रतापजी यांच्या शौर्य, स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा व बलिदानाचा गौरव केला. "महाराणा प्रतापजी हे केवळ राजपूत समाजाचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान असून त्यांच्या विचारांवर चालणे ही आजच्या पिढीची गरज आहे," असे ते म्हणाले. सेच समाजाने शिक्षण, संघटन व सामाजिक एकतेवर भर द्यावा, युवकांनी महापुरुषांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाज व देशाच्या प्रगतीसाठी कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी क्षत्रिय राजपूत समाज मंडळाचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाज मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रदीपजी कुमरे सरपंच पिसेवडधा, मिलींदभाऊ खोब्रागडे तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी आरमोरी,विश्वेश्वर दरो तालुका अध्यक्ष आदिवासी सेल काँग्रेस कमेटी आरमोरी, प्रा.दौलतदादा धुर्वे मा.सदस्य जि.प.गडचिरोली, बसंतसिंह बैस राजपूत समाज संघटक, अरूणसिंह पवार गड, सुमितसिंह ठाकुर विधर्ब अध्यक्ष राष्ट्रीय राजपूत करणी सेना, रोषनीताई बैस, राहुल बैस विधर्ब अध्यक्ष युवा कर्णसेना, प्रतिभासिंह राणा गोंदिया, किशोरसिंह परमार, सुधाकर मडावी साहेब, जितसिंह बुंदेला,,कल्याणी चंदेल, अन्य मान्यवर मंडळी, राजपूत समाज बांधव व गावातील ग्रामवासीय मोठया संख्येने उपस्थित होते.









## चालकाचा ताबा सुटल्याने पुणे–सोलापूर महामार्गावर भीषण अपघात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी रात्री उशिरा एक हृदयद्रावक घटना घडली आहे. अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला भीषण अपघात झाला असून, यामध्ये ५ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवडी पाटीजवळ रात्री साडेअकराच्या सुमारास हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल (जि. रायगड) येथून सहा मित्र एर्टिगा कारने (क्रमांक MH-46 Z 4536) अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघाले होते. शनिवारी (१७ जानेवारी २०२६) रात्री ११:३० च्या सुमारास ही कार मोहोळ जवळील देवडी पाटी परिसरात आली असता, चालकाचा वाहनावरील ताबा अचानक सुटला. भरधाव वेगातील ही कार महामार्गापासून सुमारे १० ते १५ फूट दूर झुडपांमध्ये जाऊन एका मोठ्या झाडावर जोरात आदळली. हा अपघात एवढा भीषण होता की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. धडकेचा आवाज ऐकून आसपासच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. कारमध्ये ३ पुरुष आणि ३ महिला असे एकूण ६ प्रवासी होते. यापैकी ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह वाहनामध्ये पूर्णतः अडकलेल्या अवस्थेत होते. या अपघातातून ज्योती जयदास टाकले (रा. सेक्टर ७, पनवेल) या महिला सुदैवाने बचावल्या आहेत.

## संक्षीप्त

### महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हास्तरावर कामकाज सुरु

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच त्याअंतर्गत कार्यरत 13 उपकंपन्यांची स्थापना शासनाने केली आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत. लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ, सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (लाडशाखीय वाणी/ वाणी समाज), स्व. विष्णुपंत रामचंद्र दादरे (लोणारी) आर्थिक विकास महामंडळ (लोणारी समाज), श्री संत नामदेव महाराज शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ (शिंपी समाज), संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ (सुतार समाज), सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ, संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ (सोनार समाज), संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (तेली समाज), संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ (बारी समाज), आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ (लिंगायत समाज), संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ (गुरव समाज), संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ (नाभिक समाज), महामंडळाचे जिल्हा स्तरावर गडचिरोली येथे कामकाज सुरु करण्यात आले आहे. महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी, महामंडळामार्फत सहा योजना राबविल्या जात असून त्यामध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना या पूर्णता ऑनलाईन स्वरूपाच्या आहेत. या योजनांसाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह www.msobcfdc.org या वेब पोर्टलवर अर्ज करणे अनिवार्य आहे. 20% बीज भांडवल योजना व थेट कर्ज योजना(रु. 1.00 लक्ष पर्यंत) या योजना ऑफलाईन स्वरूपाच्या असून त्याचे अर्ज जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आय. टी. आय. मागे, कॉम्प्लेक्स, गडचिरोली दूरध्वनी क्र. 07132-223024 या ठिकाणी संपर्क साधावा.असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक के. के. सातपुते यांनी केले आहे.

### ज्येष्ठ नागरिकाची 22 लाखांची फसवणूक

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे शहरात सायबर गुन्हेगारांनी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये एका ज्येष्ठ नागरिकाची २२ लाख रुपयांची, तर एका महिलेची ४ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष आणि काळ्या पैशांच्या व्यवहारात कारवाईची भीती दाखवून ही फसवणूक करण्यात आली. या दोन्ही प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या घटनेत, एका ज्येष्ठ नागरिकाला गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात सायबर चोरट्यांनी संपर्क साधला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष त्यांना दाखवण्यात आले. चोरट्यांनी सुरुवातीला काही रक्कम त्यांच्या खात्यात जमा करून परतावा मिळाल्याचे भासवले, मात्र प्रत्यक्षात कोणताही परतावा दिला नाही. या आमिषाला बळी पडून ज्येष्ठ नागरिकांनी वेळोवेळी चोरट्यांच्या खात्यात एकूण २२ लाख तीन हजार रुपये जमा केले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दुसऱ्या घटनेत, कोंढवा येथील एका ४८ वर्षीय महिलेची ४ लाख ८२ हजार रुपयांची फसवणूक झाली. डिसेंबर महिन्यात सायबर चोरट्यांनी महिलेला संपर्क साधून तिच्या बँक खात्याचा वापर काळ्या पैशांच्या व्यवहारात झाल्याचे सांगितले. या प्रकरणात पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे जमा करण्यास सांगितले. भीतीपोटी महिलेने चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेनेही पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक संगीता देवकाते या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# सिरोंचा तालुक्यात रेल्वे लाईनसाठी द्यावी

## मूलभूत सोयीसुविधांचा अभाव, रोजगारासाठी मजुरांची तेलंगणाकडे धाव

### भाजप अल्पसंख्याक आघाडी महामंत्री शारीक शेख यांनी शासनाकडे रेल्वेमार्ग मंजुरीची केली मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



सिरोंचा : गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण टोकावर, प्राणहिता व गोदावरी या दोन मोठ्या नद्यांच्या संगमावर वसलेले सिरोंचा हे ऐतिहासिक शहर आजही मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहे. येथे स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे उलटूनही रेल्वे जाळे, उद्योगधंदे आणि पायाभूत सुविधा नसल्याने स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या शोधात तेलंगणा राज्यात स्थलांतर करावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शारीक शेख यांनी सिरोंचा तालुक्यासाठी वरंगल–सिरोंचा–जगदलपूर रेल्वेमार्गास शासनाने तत्काळ मंजुरी द्यावी, अशी ठाम मागणी केली आहे.

"खनिजसंपत्ती विपुल, पण उपयोग नाही" सिरोंचा तालुका खनिजसंपत्तीने समृद्ध असून नंदीगाव परिसरात चुनखडकाचे मोठे साठे आहेत. तसेच गोदावरी व प्राणहिता नदीखोऱ्यात दगडी कोळसा, जिप्समसारखी महत्त्वाची खनिजे उपलब्ध आहेत. मात्र योग्य दळणवळण व वाहतुकीची साधने नसल्याने या संसाधनांचा विकासासाठी वापर होऊ शकलेला नाही.

"वनसंपत्ती आणि शेती उत्पादनाला बाजारपेठेचा अभाव".. सिरोंचा आणि भामरागड परिसरातील सागवान आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत लोकप्रिय आहे. तरीही येथील वनसंपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी औद्योगिक प्रोत्साहन मिळालेले नाही. शेती क्षेत्रात कापूस व लाल मिरचीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते, परंतु स्थानिक बाजारपेठ नसल्याने शेतकऱ्यांना कापूस मध्यप्रदेशात आणि मिरची नागपूर येथे विकावी लागते.

"आंतरराष्ट्रीय दर्जाचा तंबाखू पण बंदीचा अडथळा" आसरअल्ली, अंकिसा आणि सिरोंचा परिसरात वर्जिनिया नावाचा उच्च दर्जाचा तंबाखू घेतला जातो, जो आंध्र प्रदेशातील गुंटूरमार्गे कॅनडा देशात निर्यात केला जातो. तथापि शासनाने या तंबाखू उत्पादनावर बंदी आणल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

मूलभूत सुविधांची कमतरता कायम तालुक्यात आजही अनेक गावांमध्ये पक्के रस्ते, वीज आणि बससेवा उपलब्ध नाहीत. त्यामुळे लोकांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगारासाठी त्रास सहन करावा लागतो. गोदावरी नदीवरील पूल बांधल्याने सिरोंचा तालुक्याला हैदराबाद व वरंगलसारख्या मोठ्या बाजारपेठेशी जोड मिळाली असली, तरी रेल्वे संपर्क नसल्याने औद्योगिक विकासात अडथळा येतो आहे.

शासनाकडे ठाम मागणी उद्योग, रोजगार आणि वाहतूक विकासासाठी वरंगल–सिरोंचा–जगदलपूर हा तीन राज्ये आणि सहा जिल्ह्यांना जोडणारा रेल्वेमार्ग अत्यावश्यक असल्याचे शारीक शेख यांनी नमूद केले. या रेल्वेमार्गामुळे गडचिरोली जिल्ह्याचा दक्षिण भाग औद्योगिकदृष्ट्या विकसित होईल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि स्थानिक तरुणांना स्थलांतर करावे लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. सिरोंचा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वेमार्गाला तातडीने मंजुरी देऊन शासनाने ठोस पाऊल उचलावे, अशी मागणी स्थानिक नागरिक, शेतकरी आणि लोकप्रतिनिधींनी एकमुखाने केली आहे.

## आपल्या परिसरातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निश्चितच घडू शकतील : माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव महाराज

### जय सेवा क्रीडा मंडळ यांच्या वतीने भव्य कबड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन.!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



एटापल्ली : तालुक्यातील गुरुपल्ली येथील जय सेवा क्रीडा मंडल यांच्या वतीने गावातील युवकांना क्रीडाक्षेत्रात प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने भव्य कबड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन अहेरी इस्टेटचे राजे तथा माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव महाराज यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. उद्घाटनप्रसंगी संबोधित करताना राजे अम्ब्रीशराव महाराज म्हणाले की, ग्रामीण भागातील युवकांमध्ये नैसर्गिक क्रीडागुण दडलेले आहेत. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव व अशा स्पर्धांची संधी मिळाल्यास या परिसरातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निश्चितच घडू शकतील असे मत त्यांनी व्यक्त केले. पुढे बोलतांना ते म्हणाले या खेळामुळे युवकांमध्ये शिस्त, संघभावना व आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यातूनच आपल्या परिसराचे नाव राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल होईल. या स्पर्धेत विविध गावांतील कबड्डी व व्हॉलीबॉल संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दोन्ही खेळांमध्ये अत्यंत चुरशीच्या व रोमांचक लढती पाहायला मिळाल्या.

खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. तसेच यावेळी राजे साहेबांच्या हस्ते गरीब कुटुंबाला पाण्याची कॅन व जग वाटप करण्यात आले.! या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते कुमार अवधेशराव बाबा आत्राम, साईनाथ गावडे, महादेव गावडे सविता गावडे सरपंच तुमरगुंडा, रंजना गावडे ग्रा सदस्य, भाजप तालुका अध्यक्ष प्रसाद पुल्लूरवार, भाजप महामंत्री प्रशांत आत्राम, भाजप जिल्हा सचिव मोहन नामेवार, ज्येष्ठ नागरिक देवूजी मट्टामी, रैजू गावडे, टिल्लूजी मट्टामी, डोलूजी दुर्वा आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिस्त, सेवा व नेतृत्व घडवणारी स्काऊट : गाईड चळवळ समाजाचा मजबूत पाया : आमदार मसराम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशभक्ती, सेवा वृत्ती आणि नेतृत्वगुण रुजविणारी स्काऊट–गाईड चळवळ ही केवळ उपक्रम नसून समाज घडवणारी प्रभावी चळवळ असल्याचे प्रतिपादन आमदार रामदास मसराम आरमोरी विधानसभा क्षेत्र यांनी केले. गडचिरोली भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा संस्था, गडचिरोली व शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित स्काऊट गाईडचा २३ वा जिल्हा मेळावा दिनांक १८ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री. तुकाराम विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, कढोली, ता. कुरखेडा जि. गडचिरोली येथे आयोजित केलेला आहे .दि.१९ जानेवारी रोजी आयोजित या स्काऊट–गाईड मेळाव्याच्या उद्घाटन सोहळ्याच्या उद्घाटक स्थानावरून ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री .तुकाराम शिक्षण संस्था गडचिरोली चे सचिव पुंडलिक रामचंद्र आकरे होते. प्रमुख आतिथी म्हणून गटविकास अधिकारी धिरज पाटील पंचायत समिती कुरखेडा ,जिल्हा आयुक्त स्काऊट तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वासुदेव भुसे, जिल्हा चिटणीस तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) अमरसिंग गेडाम, कढोली ग्रामपंचायत चे सरपंच परीखाबाई रंधये , सामाजिक कार्यकर्ते धनपाल मिसार ,शाळा समिती अध्यक्ष डॉ,मोहन आकरे तुकाराम विद्यालय कढोली ,संचालक डी.डी. आकरे ,संचालक आनंदराव आकरे ,माजी जिल्हा मुख्यालय आयुक्त (स्काऊट ) शमशेरखाँ पठाण, माजी जिल्हा मुख्यालय आयुक्त (गाईड) श्रीमती लिना हकीम, जिल्हा आयुक्त गाईड श्रीमती वंदना मुनघाटे, उपसरपंच किरण आकरे कढोली, गटशिक्षणाधिकारी प्रविण शिवणकर कुरखेडा, विस्तार अधिकारी नरेंद्रकुमार कोकुडे, ग्रामविकास अधिकारी ठाकरे ,केंद्रप्रमुख हेमके कढोली, मुख्याध्यापक दामोधर शिंगाडे, मुख्याध्यापक महेश मुंडले, मुख्याध्यापक विष्णू दुनेदार, मुख्याध्यापक जगदिश केळझरकर, मुख्याध्यापक दिलिपकुमार जगदिशप्रसाद आहुजा, ईश्वर चौधरी ,मनोहर नारनवरे, जिल्हा आयुक्त स्काऊट बिधान बेपारी, जिल्हा मेळावा प्रमुख माजी जिल्हा चिटणीस गडचिरोली भारत स्काउट आणि गाईड अजय लोंढे, सहाय्यक जिल्हा प्रशिक्षण आयुक्त मनोज निंबार्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आमदार मसराम पुढे म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांना सामाजिक भान, संकटात धैर्य आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देण्याचे कार्य स्काऊट–गाईड चळवळ करते. अशा उपक्रमांना शासनस्तरावरून कायम प्रोत्साहन दिले जाईल,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संघटक विवेक कहाळे यांनी केले. उद्घाटन सोहळ्याचे संचालन प्रशिक्षण आयुक्त (गाईड )श्रीमती कांचन प्रमोद देशमुखे यांनी केले.हा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत असून स्काऊट–गाईड चळवळीला नवसंजीवनी मिळाल्याची भावना उपस्थितांमध्ये व्यक्त होत होती.

## एकलव्य कबड्डी क्लब वालसरा यांच्या वतीने भव्य डे-नाईट कबड्डी स्पर्धा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : एकलव्य कबड्डी क्लब, वालसरा यांच्या वतीने भव्य डे-नाईट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असता या स्पर्धेचे उद्घाटन मा. महेंद्रभाऊ ब्राम्हणवाडे, अध्यक्ष, गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या हस्ते पार पडले. मनोहर पाटिल पोरेटी मा. उपाध्यक्ष जि. प. गडचिरोली यांची उपस्थिती होती.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना मनोहर पाटिल पोरेटी यांनी सांगितले की, खेळ हा आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कबड्डीसारख्या खेळामुळे शरीराचा सर्वांगीण व्यायाम होतो, ज्यामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढते. तसेच युवकांमध्ये शिस्त, संघभावना व आत्मविश्वास निर्माण होतो. ग्रामीण भागातील युवकांनी मोबाईल व अपायकारक सवयींपासून दूर राहून खेळाकडे अधिक लक्ष द्यावे व नियमितपणे क्रीडा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी महेंद्रभाऊ ब्राम्हणवाडे जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी गडचिरोली, भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव ॲड. विश्वजितभाऊ कोवासे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल कोठारे, पर्यावरण विभाग अध्यक्ष राजेश ठाकूर, प्रभाग संघ अध्यक्ष सौ. सागरताई कुमरे, वालसरा येथील पोलीस पाटील भगीरथजी भांडेकर, शासकीय कंत्राटदार गंगाधरजी कुकुडकर, डी. वाय. एस. पी. लांबेवार साहेब, उमेशभाऊ कुमरे, सुरपाम साहेब, गौरव येणप्रेडडीवार, विजयभाऊ लाड, निलभाऊ ठाकूर,अनुप कोहळे, प्रफुल बारसागडे, विनायक बारसागडे, वसंत कोहळे, मारोती कोपूलवार, आशिष घेर यांच्यासह मान्यवर, युवक, मंडळाचे सहकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.





## तपोवनात शेणासह काडी कच-यातून यंत्राद्वारे लाकूड निर्मिती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अमरावती : स्वच्छता, सुंदरता, पुनर्वापर या तत्त्वावर कुष्ठरुग्णांची सेवा करणारे विदर्भ महारोगी सेवा संस्थान, तपोवन येथे शेण, पालापाचोळा, काड्या, कचऱ्यातून यंत्राद्वारे पर्यावरणपूरक लाकडाची निर्मिती केली जात आहे. यातून कुष्ठ मुक्त बांधवांना दिवसाला ५०० रु. रोजगार मिळत आहे.

तपोवन येथे गोशाळा असून, तेथे ७० गायी- म्हशी आहेत. त्यापासून दिवसाला बऱ्याच मोठ्या प्रमाणात शेण मिळते. ३८८ एकर अशा विस्तीर्ण परिसरात या संस्थेची व्याप्ती असून, येथे १ लाखापेक्षा जास्त विविध प्रजातींची झाडे आहेत. त्यांचा पालापाचोळा दररोज मोठ्या प्रमाणात गोळा केला जातो. त्यामुळे स्वच्छता राहते. हा पाला-पाचोळा, लहान काड्या, भुसा न जाळता एकत्र करून तो शेणात मिसळला जातो. गोशाळेत बसवलेल्या यंत्राद्वारे लाकडाची निर्मिती होते. यासाठी काम करणाऱ्या कुष्ठ मुक्ताला दिवसाला ५०० रु. रोजगार मिळतो. कुष्ठ रुग्णांच्या सेवेसाठी शहरातील तपोवन परिसरात पद्मश्री दाजीसाहेब पटवर्धन यांनी उभारलेल्या विदर्भ महारोगी सेवा संस्थानात कुष्ठरोगातून बरे झालेल्या (कुष्ठमुक्त) बांधवांना रोजगार मिळावा, यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. याअंतर्गत कुष्ठरुग्णांवर नि:शुल्क उपचार करणारे रुग्णालय, केनिंग, सागवानी लाकूड व स्टीलपासून निर्मित फर्निचर, गोशाळा, शेती, झाडांची मशागत, सतरंजी, चादरींची निर्मिती, प्रिंटींग प्रेस चालवली जाते. यासाठी शासनाकडून निधी मिळत नाही. ७० आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शाळा काढली असून, तेथे त्यांना नि:शुल्क शिक्षण दिले जात आहे. त्यांचा खर्च विदर्भ महारोगी सेवा संस्थेद्वारे केला जातो.

## आधारभूत मका खरेदीतील कमिशन व मंडी लेबर चार्जेस द्या

### अविका संस्था कुरखेडा उपाध्यक्ष चांगदेव फाये यांची आदिवासी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्याकडे मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



कुरखेडा : शेतकरी हिताच्या दृष्टिकोनातून आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कुरखेडा च्या वतीने खरेदी केलेल्या मका खरेदीचा कमिशन व मंडी लेबर चार्जेस मागील तीन चार वर्षांपासून प्रलंबित असून अविका संस्थेला आर्थिक अडचणी निर्माण झाली असून प्रलंबित कमिशन व मंडी लेबर चार्जस त्वरित देण्यात यावी या मागणीसाठी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष चांगदेव फाये यांनी आदिवासी विकास महामंडळ नाशिकच्या व्यवस्थापकीय संचालक लीनाताई बनसोडे मॅडम यांना निवेदन सादर करून त्वरित प्रलंबित कमिशन लेबरच्या देण्याची मागणी केली आहे. आदिवासी विकास महामंडळ नाशिकच्या व्यवस्थापकीय संचालक लीनाताई बनसोडे यांनी कुरखेडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेला भेट दिली त्याप्रसंगी चांगदेव फाये यांनी मागणी केली. यावेळी आदिवासी विकास महामंडळाचे संचालक गोपालजी उईके, जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष वसंतरावजी मेश्राम, आदिवासी विविध कार्यकारी संस्थेचे पदाधिकारी तसेच आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. आधारभूत मका खरेदी हंगाम 2021 -2022 मध्ये खरेदी वजन 6008.50 क्विंटल खरेदी झाली तसेच हंगाम 2023-20 24 मध्ये खरेदी वजन 10892 झाली असून एकूण दोन्ही हंगामातील खरेदी वजन 16950.50 झालेले आहेत खरेदी पोटी होणारे कमिशन प्रत्येक क्विंटल 20 प्रमाणे 3 लाख 38 हजार 10 रुपये झाले आहेत तसेच मंडी लेबर चार्जेस खरेदी वजन 16950. 50 खरेदी पोटी होणारे मंडी लेबर चार्जेस प्रतिक्विंटल 11रुपये प्रमाणे रक्कम 1लाख 85 हजार 905.50 झाली असून मागील चार वर्षापासून कमिशन व मंडी लेबर चार्जेस प्रलंबित असल्यामुळे आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेला विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदर प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात आपल्या स्तरावर कारवाई करावी यासंदर्भात आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष चांगदेव फाये यांनी आदिवासी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड मॅडम यांना निवेदन सादर करून मागणी केली. तसेच आदिवासी विविध कार्यकारी संस्था निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नासंदर्भातही यावेळी चर्चा होऊन प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी मागणी यावेळी करण्यात आले.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
**जिल्हा प्रतिनिधी**
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
**जिल्हा प्रतिनिधी**
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
**जिल्हा प्रतिनिधी**
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
**जिल्हा प्रतिनिधी**
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
**जिल्हा प्रतिनिधी**
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**